सार्वजनिक सेवा करी ।।३०।। तें इष्टपूर्तादिक कर्म । करिता भक्तिपूर्ण मनोरम । त्याहूनही शतगुण पुण्य शोभन । लाभतें खंड हा ऐकता ।।३१।। अन्य पुराणे इतिहासयुक्त । ऐकता पुण्य जें लाभत । त्याहून अधिक पुण्य प्राप्त । ह्या खंडाच्या वाचनानें ।।३२।। काय वर्णावें बहुत जेथ । ब्रह्मपति असे वर्णित । त्या विकटाच्या सम जगांत । अन्य कोण संभवेल ।।३३।। सुत म्हणे शौनकाप्रत । ऐसे सांगून मुद्गल थांबत । महायोग्यास त्या नमित । दक्षप्रजापति हर्षानें ।।३४।। तेव्हां मुद्गल त्यास म्हणत । सांगितलें तुजला विकटचरित । कामासुराचा नाशकर पुनीत। द्विजोत्तमा दक्षा हें पूर्ण ।।३५।। धर्मार्थकाममोक्षदायक । ब्रह्मपर हें पावक । ह्यासम अन्य न सौख्यदायक । आणखी काय ऐकूं इच्छिसी ।।३६।। ऐसें मुद्गलें विचारिलें । तेव्हा दक्षें काय सांगितलें । तें पुढिल खंडी वर्णिलें । सीताराम विनम्र गणेशचरणी ।।३७।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरितसमाप्तिवर्णनं नाम पंचचत्वारिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पंचेचाळिसांवा संपूर्ण)

।। ओमिति श्रीमुद्गलपुराणे षष्ठः खंडः समाप्तः ।।

卐

।। अथ श्रीमुद्गलपुराणे सप्तमः खंडः प्रारभ्यते ।।

ॐ श्रीगणेशाय नमः । शौनक म्हणे सूतासी । विकट चरित्र कथिलेंस

आम्हांसी । हर्षित केलें मानसासी । ब्रह्मभूय प्रकाशज्ञानें ।।१।। जें जें कांहीं गणराजाचें चेष्टित । तें तें बह्मसायुज्यप्रद निश्चित । व्यासशिष्या धन्य भाग्य वाटत । आम्हां समस्त मुनिजनांचें ।।२।। कारण योगप्रदा तुझें दर्शन । साधुरूपा आम्हां होऊन । योगवृष्टिमयी गाथा ऐकून । तव मुखमेघांतून जी वर्षली ।।३।। पिऊन सुधा तृप्त । जैसा नर ना कधी होत । तैसें आमुचें चित्त । अद्यापि ना तृप्त झालें ।।४।। आतां मम असुर विनाशपर । सांगावें विघ्नराजाचें चरित्र । जें निश्चित ब्रह्मप्राप्तिकर । कृपा करून आम्हांसी ।।५।। सूत म्हणे मुद्गलमुखांतून । पुण्यकथा विकटाची ऐकून । दक्ष प्रजापति प्रमुदितमन । म्हणे धन्य जन्म कर्मादि माझें ।।६।। ज्या योगें तव समागम । जाहला अतीव मनोरम । योगदापूर्ण कथा अभिराम । सांगितलीस तूं मजला ।।७।। आंगिरस कुळांत योगरूपधर । साक्षात् तूं जन्मलास थोर । कुलतारक श्रेष्ठ मुनिवर । आतां विघ्नराज महिमा सांगा ।।८।। विकटाचें माहात्म्य ऐकलें । परी माझें चित्त न धालें । मुद्गला पुनरपि पाहिजे कथिलें । गणेशाचें चरित्र मजला ।।९।। कैसें ब्रह्म वर्तत । तें देहधारी कां होत । याचें कार्य काय असत । कुठें निवास गणेशबह्माचा ।।१०।। तो विनायक या अवतारांत । विघ्नराजरूपें कोणास मारित । दैत्यवध कोठे करित । तें सर्व सांग महात्म्या मजला ।।११।। मुद्गल म्हणे हें ऐकून । योगिवंद्य होशील पावन । दक्षा गणेशकथा शोभन । ऐकतां प्रीति वाढली तुझी ।।१२।। संक्षेपानें तुज सांगेन । विघ्नराजाचें चरित महान । ऐक तें श्रद्धाभाव ठेवून । कथा सर्व सिद्धिप्रदायक ही ।।१३।। येथ तुज इतिहास पुरातन । कश्यप दिती संवादरूप पावन । सांगेन तो ऐक प्रसन्न । अद्भुतरम्य हा वृत्तान्त ।।१४।। दितीचें दोन सुत । हिरण्यकशिपु हिरण्याक्ष असत । हिरण्याक्षा वधी मायायुक्त । विष्णु

देव प्राचीन काळीं ।।१५।। तेव्हां अति शोकयुक्त । दिती कश्यपाकडे जात । त्याच्या सेवेत सदा निरत । भक्तिभावपरायणा ।।१६।। ऐसा बहु काळ सेवा करित । कश्यप तेव्हां संतुष्ट होत । वर माग म्हणे भार्येप्रत । तेव्हां दिती त्यास म्हणे ।।१७।। माझे दोन पुत्र वधिले । विष्णूनें इंद्रास्तव हें कृत्य केलें । म्हणून इंद्रास मारील ऐसें भलें । पुत्ररत्न दे कश्यपा मला ।।१८।। तिचें तें ऐकून वचन । कश्यप शोकयुक्त मन । म्हणे साधुचरित्र स्त्रीही विश्वासार्ह न । कोणासीही कदापिही ।।१९।। आतां काय करावें । धर्मपालका सुता इंद्रा कैसें वाचवावें । धर्मपालक जो स्वभावें । साधुगुणयुक्त स्वभावानें ।।२०।। म्हणून विघ्नेश्वरासी स्मरून । प्रजापति तिजला बोले वचन । एक वर्ष करी व्रत प्रयत्नें करून । महादुष्टे यास्तव तूं ।।२१।। तेव्हां तुज जो होईल सुत । तो इंद्राचा वधकर्ता निश्चित । परी खण्ड पडूं न देई व्रतांत । विघ्न आलें तरीही ।।२२।। ऐसें बोलून गणेशास ध्यात । तदनंतर तिच्या संगे रमत । वीर्य ओतून तिच्यांत । सुपुत्रद व्रत तें दिलें ।।२३।। त्यास प्रणाम करून । ती स्वगृहीं परतून । व्रत करी मनापासून । नियमपूर्वक प्रजापते ।।२४।। हा वृत्तान्त इंद्रास ज्ञात । जाहला नारदमुखांतून । तोही गणेशास मनीं ध्यात । निःश्वास सोडी भयानें ।।२५।। तेव्हां त्याच्या हृदयांत । विघ्नराज जो सदा वसत । तो त्यास बुद्धी देत । इंद्र तेव्हां काय करी ।।२६।। देवी मातेची करण्या सेवा उन्मन । इंद्र गेला उत्सुकमन । दितीस करी नित्य प्रसन्न । व्रतयुक्त जी होती ।।२७।। प्रजानाथ छिद्रदर्शी तो भक्तियुक्त । प्रतापवंत इंद्र सेवारत । ऐसे नऊ महिने जात । तथापि छिद्र त्यास न मिळालें ।।२८।। म्हणून सुरेश्वर झाला विव्हल । विघ्नराजास ध्याई निर्मल । सुराधिप तो चिंतेनें प्रबल । सेवी दितीस तन्मयत्वें ।।२९।। एक वर्ष पूर्ण होण्यास । दहा दिवस

कमी असतां विशेष । तो आतां काय होईल या भयास । चित्तीं बाळगून दु:खित झाला ।।३०।। परी त्यानंतर अघटित घडत । विघ्नकर एक विघ्न आणित । दिती स्वयं होऊन मोहित । भ्रान्त अत्यंत जाहली ।।३१।। विचार करी आपुल्या मनांत । व्रतास संवत्सर पूर्ण होत । थोडेच दिवस न्यून असत । सिद्ध जाहली मम वांछा ।।३२।। आतां इंद्राचें राज्य हिरावून । अखिल त्रैलोक्यीं सत्ता स्थापून । जो करील इच्छा पूर्ण । ऐसा सुत मज होईल ।।३३।। मीं आतां कृतकृत्य होणार । यांत संशयास न थार । ऐशा विचारें निद्रापर । दिती झोपली त्याच ठायीं ।।३४।। दोन जानूंमध्ये टेकित । मस्तक आपुलें ती त्वरित । दिवसा निद्रा येऊन भंगत । व्रत तेव्हां त्या सतीचें ।।३५।। दोन गुडघ्यांत होतें शिर । त्यांत दोन पडलीं छिद्रें उग्र । इंद्र तिज निद्रित पाहून मोदपर । गजाननाचें स्मरण करी ।।३६।। वज्र हातांत घेऊन । मायेनें उदरीं तिच्या जाऊन । तेज:पुंज गर्भ पाहून । सात तुकडे करी वज्रानें ।।३७।। देवनायक ऐसें वैर साधित । परी तो गर्भ ना मरत । दितीचें तेज उग्र असत । गर्भाचें रक्षण करी तै ।।३८।। तो गर्भ सप्तखंडांत । जरी भिन्न झाला तरी न मृत । तैसाच सप्त खंडांत रडत । अत्यंत तेजस्वी गर्भ तेव्हां ।।३९।। तें पाहून विस्मित चित्त । इंद्र विघ्नेश्वरा पुन: स्मरत । त्या एकेक खंडाचें करित । सात तुकडे वज्रधारेनें ।।४०।। तथापि तो गर्भ पावन । न पावला मृत्यू तत्क्षण । देहधारी होऊन वचन । बोले रडत भयविव्हल ।।४१।। मघवंता इंद्रास गर्भ म्हणत । सुरेश्वरा कां मज मारण्या उद्यत । आम्ही भाऊ तुझे समस्त । यांत संशय मुळीं नसे ।।४२।। त्यांचें तें वचन ऐकत । तेव्हां इंद्र तयांस म्हणत । वैरभाव सोडून व्हावें भविष्यांत । दिवौकसमुने सर्वांनीं ।।४३।। ते सारे तें मान्य करित । तेव्हां इंद्र बाहेर पडत । दितीची निद्रा भंग

होत । दिवसा निद्रेनें शोकमग्न ती ।।४४।। त्याच अवधींत ती होत प्रसूत। एकूणपन्नास सुतां जन्म देत । त्यांस पाहून ती इंद्रास म्हणत । इंद्रा बहु पुत्र कैसे झाले ।।४५।। मी तर एकाचा संकल्प केला । परी हा काय प्रकार झाला । सत्य सांगे सुरेश्वरा मजला । जरी तुजला ज्ञात असे ।।४६।। तेव्हां इंद्र सत्य सांगत । म्हणे मज होतें अवगत । तूं जे केलेंस व्रत । माझा नाश करण्यासाठीं ।।४७।। तें जाणून तुझें हद्गत । मीं हेतूनें आलों सेवेस्तव येथ । छिद्र पाहतां व्रताचरणांत । दिवानिद्रा तुज येतां ।।४८।। मी तत्क्षणीं तुझ्या जठरांत । मायेनें प्रवेश केला त्वरित। वज्रानें छेदिला सात खंडांत । गर्भ परी तो तैसाची ।।४९।। नष्ट ना होत म्हणून । पुनरपि प्रत्येक खंड छेदून । केले एकूणपन्नास खंड लहान। नंतर बाहेर पडलों मी ।।५०।। परी तुझ्या तपोबळानें जीवित। राहिले ते खंड समस्त । आतां प्राणयुक्त दिसत। ते सारे वायुरूप ।।५१।। त्यास घेऊन समवेत । मघवा स्वर्गांत जात । ती त्यास शाप न देत । सत्य बोलला म्हणून ।।५२।। त्या इंद्रावर संतुष्ट होत । परी दैत्यांस दीन पाहून येत । शोकपरायण अत्यंत । पुनरपि कश्यपासमीप ती ।।५३।। त्यास प्रणाम करी पतिव्रता । त्यास म्हणे अतिदु:खिता। विनयनम्र स्वार्थमोहयुता । स्वामी ऐका वृत्तान्त ।।५४।। दिती कश्यपांचा संवाद । पुढील अध्यायीं असे विशद । सातव्या खंडाचा प्रारंभ सुखद। या अध्यायें जाहलासे ।।५५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते दितिशोकवर्णनं नाम प्रथमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पहिला संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । दिति म्हणे कश्यपाप्रत । स्वामी माझे दोन

पुत्र मृत । होते म्हणून व्रत केलें अविरत । परी वांछा न माझी पूर्ण झाली ।।१।। या वेळीं इंद्राचा वध करील । ऐसा पुत्र व्हावा प्रबळ । ही इच्छा झाली फोल । सुत जो झाला तो इंद्रमित्र ।।२।। नाना स्वरूपयुक्त सुत । एकूणपन्नास रूपें विलसत । ते सारे इंद्राचे मित्र होत । दैत्य दु:खित जाहले ।।३।। त्यांच्यासाठीं काय करावें । सांगा नाथा मज आघवें । माझा प्रयत्न पूर्णत्व न पावे । निष्फळ झाला व्याप सारा ।।४।। तूं असतां माझा नाथ । ऐसें दु:ख मज व्हावें प्राप्त । याची तुजला काय खंत । सांग आतां काय करूं ।।५।। पुत्रपौत्रादि संयुक्त । ऐसा संसार मनीं वांछित । तो तू असताही न साध्य मजप्रत । निष्फळ झालें जीवन ।।६।। मुद्गल म्हणती दक्षाप्रत । तिचें तें वचन ऐकून खेदयुक्त । प्रजापति स्मित करून म्हणत । योगींद्र तो परमार्थवेत्ता ।।७।। कश्यप म्हणे खेद न करी । कर्माची गति ऐशीच खरी । कल्याणि दु:खमोहादि संसारीं । अटळ ऐसें शास्त्र सांगे ।।८।। दैत्य पापकर्मपर । देव पुण्यांत मग्न फार । पाप्यांस न मिळे सुखलाभ थोर । वेदवचन हें शाश्वत ।।९।। ऐसें जें वेदाचें वचन । तें सत्य असे त्यांत संदेह न । तेव्हा ममता दे सोडून । पुत्र जाहले ना तुला ।।१०।। त्या एकूणपन्नास पुत्रांचे सुत । होऊन वंश तुझा जगांत । दैत्य मृत्युयोग्य असत । त्यास्तव वृथा कां तूं श्रमसी ।।११।। कश्यपाचें ऐकून वचन । दिति पुनरपि खिन्नवदन । म्हणे शोक संतप्त गात्र दीन । तेज:पुंज स्वपतीस ।।१२।। सृष्टिकर्ता तूं साक्षात । तूं समर्थ संशयातीत । अघटित तें शक्य तुजप्रत । अतर्क्य शक्ति असे तुझी ।।१३।। सर्व भावांत ममता त्यागून । योगिसत्तमा जाणून वेदज्ञान । बैसला अससी स्थितप्रज्ञ । महामते बुद्धिमंता ।।१४।। परी मी मोहांत निमग्न । तापत्रयांत बुडून । जळतें सर्वदा मनीं खिन्न । ममतात्याग कैसा करूं ।।१५।।

याचा मार्ग मज सांगावा । जेणें शांतीचा लाभेल ठेवा । माझा अन्तर्दाह शमावा । होणार तें सुखें होवो ।।१६।। तिचें हें ऐकून वचन । कश्यपासी दया येऊन । शांतिमार्गीं लागण्या मन । म्हणे तिजला हर्षयुक्त ।।१७।। येथ एक इतिहास पुरातन । सांगतों तुजला तो ऐकून । तूं होशील शांतियुक्त मन । भजशील देवा गजाननासी ।।१८।। हिमालयाची सुता पार्वती । भगिनी तुझी झाली जी जगतीं । महामाया आराधिली प्रीती । त्या पर्वतश्रेष्ठानें तैं ।।१९।। हिमालयावरी जाऊन । शिव बैसला ध्यानपरायण । उग्र तप आचरून । गणेशाचें चिंतन करी ।।२०।। तेथ जाऊन पार्वती । सेवा करण्या उत्सुक चित्तीं । महेशासी मानून पति । यत्नपूर्वक आराधित ।।२१।। महादेव तें जाणून । चित्तीं क्रोध करी महान । माझी आज्ञा उल्लंघून । दक्षयज्ञीं पूर्वी गेली ।।२२।। जिला आपुलें हित न कळत । ऐसी पत्नी अयोग्य ख्यात । वेदशास्त्र ऐसें सांगत । म्हणोनी पत्नीविहीन मी ।।२३।। सतीनें आज्ञा अवमानिली । आतां पत्नीची आशा न उरली । मीं विघ्नपाच्या पूजेंत वाहिलीं । इतुकीं वर्षें निष्ठेनें ।।२४।। ऐसा विचार करून मनीं । महेश्वर पार्वतीस न मानी । ती जवळी येतां तत्क्षणीं । मौन धरी महादेव ।।२५।। म्हणून पार्वती खेदयुक्त । परी नियमानें सेवा करीत । सौंदर्यवती ती भक्तियुक्त । हावभाव बहु दाखवी ।।२६।। तिज नित्य सेवा परायण । पतिभावपर एकनिष्ठ मन । पाहून शिव करी गमन । दूर तो पर्वत सोडूनी ।।२७।। सदाशिव दूर जातां विमन । पार्वती शोकाकुल होऊन । देहत्याग करण्या तत्क्षण । निश्चय करती जाहली ।।२८।। ती द्विरदाननाचें स्मरण । चित्तीं करी भक्ति परायण । त्या स्मरणमात्रें स्फूर्ति उत्पन्न । जाहली तिच्या अन्त:करणीं ।।२९।। विचार करी ती मनांत । अत्यंत दु:खें पीडित । मज त्यागून गेला निश्चित । देव शंकर वीतरागी ।।३०।।

आतां तो न मज वरणार । त्याचा दृढ असे निर्धार । परी तप:प्रभावें दुष्कर । कांहीं नसे जगतांत ।।३१।। ऐसे वेदवाक्य सांगत । म्हणून मी आचरीन तप अविरत । जेणें शंभु मज लाभेल निश्चित । पार्वती ऐसा विचार करी ।।३२।। तदनंतर राहून वनांत । सखीसहित ती ध्यात सतत । सदाशिवास आपुल्या चित्तांत । पंचाक्षर विधाने एकनिष्ठा ।।३३।। लिंगपूजापरायण । नाना तपांचे करी आचरण । ऐसा बहुत कालही जातसे मन । संतुष्ट न झालें शंकराचें ।।३४।। तो स्वभावें क्रोधयुक्त । तिज न मानी कदापि मनांत । तेव्हां एकाक्षरमंत्रे ध्यात । विघ्नेश्वरासी ती नित्य ।।३५।। पूजापरायणा ती सतत । विघ्नेश्वरासी तोषवित । सदाशिवास त्यागून होत । गणेशभजनीं रत सदा ।।३६।। वारा पिऊन ती बसत । गणेशमूर्तीस पूजी भावयुक्त । ध्यान करी ती सतत । उत्तम मंत्र जपूनिया ।।३७।। पुरश्चरण करी मंत्राचें । तैं द्रवलें मन शिवाचें । मनोमिलन होऊन त्यांचें । गणेशाच्या कृपेनें ।।३८।। शिव चिंता करी मनांत । मजसाठी देवी तप आचरित । माझ्यासाठीं नियमस्थित । आतां तिजजवळीं मीं जाईन ।।३९।। जो देहधारी असत । त्यास कैसा अपराध घडत । म्हणून क्षमा करून तिजप्रत । वरीन तिजला मीं नि:संशय ।।४०।। ऐसा विचार करून चित्तांत । देवेश शंकर तेथ जात । पार्वती जेथें तप करित । श्रमयुक्त विकलांगी ती ।।४१।। तिज श्रमक्लिन्न पाहत । तेव्हां शिव झाला विस्मित मोहित । ब्रह्मचारी रूप घेत । प्रकटे नंतर तिच्या समोर ।।४२।। स्वत:चीच करी निंदा । पार्वतीस ती वाटे आपदा । निर्भत्सना त्याची करून त्वरितपदा । वनांत जाऊ लागली ।।४३।। तेव्हां अन्ती संतुष्ट होऊन । प्रकट करी स्वरूप मोहन । तें पाहतां शोभन । जगदंबिका प्रणाम करी ।।४४।। महादेवास ती स्तवित । तेव्हां तो तिज वर देत । बोले मोहयुक्त वचन त्वरित । ईश्वरेश्वर

पार्वतीसी ।।४५।। वर माग महाभागे मीं विजित । तुझ्या तपानें अविरत । देईन जें असेल कांक्षित । नि:संदेह आदरानें ।।४६।। मी नित्य तुझ्या आज्ञेंत । राहीन पार्वती प्रेमयुक्त । भार्या माझी होई त्वरित । कल्याणी प्राचीन पति मी तुझा ।।४७।। पार्वती म्हणे तयासी विनत । जरी प्रसन्न भावें वरद पुढ्यांत । शंकरा तूं प्रकट पुनीत । तरी आता ऐसें करी ।।४८।। जाऊन माझ्या पित्यासन्निध । मागणी घाली मजला अनिर्वेध । पतिव्रताधर्म दे सुबोध । विघ्नहीन जो सदा असे ।।४९।। त्यायोगें नित्य संतुष्ट । महादेवा सेवापरायण इष्ट । सेवीन तुजला मी सतत । तेव्हां शिव तें मान्य करी ।।५०।। पार्वतीसी तैं आश्वासित । पूर्ण होतील मनोरथ समस्त । यांत संशय अल्प नसत । मागणी घालीन तुला मीं ।।५१।। तुझ्या पित्याजवळीं जाऊन । याचना तुझी मी करीन । नंतर तुजला वरीन । विधिपूर्वक निश्चयें मी ।।५२।। अहो आश्चर्यकारक तप । धैर्य तैसें देहताडण निष्पाप । सर्वपूज्य तूं सुरूप । महादेवी होशील ।।५३।। कश्यप म्हणे दितिप्रत । ती भाद्रपद शुक्ल तृतीया असत । शिवाशीं होऊन संयुक्त । देवी पूजी गणनायकासी ।।५४।। तदनंतर चतुर्थी तिथि येत । त्या दिवशी प्रहर्षें होम करित । पंचमीस उपवास सोडित । ब्राह्मणांसहित जगदंबिका ।।५५।। ऐसी पारणा महोत्सवें करून । ती मूर्ति मृण्मय घेऊन । हर्षभरें जळीं विसर्जन । करून प्रार्थी विघ्नेशासी ।।५६।। तदनंतर शिव स्वस्थानीं जात । पार्वती स्वपितरांसी नमित । तेथ राहिली हर्षयुक्त । शंकरसमागमें तुष्ट झाली ।।५७।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते शिवपार्वतीसमागमो नाम द्वितीयोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय दुसरा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । कश्यप कथा पुढें सांगत । गणेशव्रत पुण्यें मोहित। शंकर सदैव पार्वतींत । तन्मय होऊन राहतसे ।।१।। विप्राचा वेष घेऊन । हिमाचलासमीप जाऊन । विघ्नेश्वरास स्मरून । नाना कळा दाखवी तया ।।२।। क्षणांत त्यास मोहवित । हिमाचल वर माग म्हणत । जरी असेल माझ्या हातांत । तरी पुरविन मनोरथ तुझे ।।३।। तेव्हां द्विज म्हणे दे मजप्रत । नगाधीशा उमा रूपयुक्त । अन्य वर मी नाही मागत । ऐकून मौन धरी तो गिरी ।।४।। त्यास पाहून शोकमग्न । जगन्मयी उमा बोले वचन । ह्यास निःशंक मज देई ताता प्रसन्न । हा शिवचि आला असे ।।५।। तें ऐकतां होत प्रमुदित । आपुली सुता देण्याचें मान्य करित । शिव स्वस्थानास जात । देव सन्मान त्याचा करिती ।।६।। शुभ लग्न पाहून गणेशपूजन । करून देवांसहित प्रसन्न । शिव गेला त्वरा करून । पर्वतेशाकडे तेव्हां ।।७।। हिमाचल प्रसन्नचित्त । स्वागत शिवाचें करित । विवाहमंगल साजरें करित । ब्राह्मणहस्तें त्यावेळीं ।।८।। वेदपारंगत ते विप्र देत । आशिर्वाद नव दांपत्याप्रत । शिवेस घेऊन नंतर जात । कैलासावरी महेश ।।९।। पार्वतीसह रममाण होत । पुढें महायोगी स्कंद जन्मत । गणेशासी तो आराधित । तारकासुरासी संहारिलें ।।१०।। दैत्य नायक तारक मदमत्त । जगासी होता पीडा देत । त्यास लीलया वधित ।चराचरा सुखी केलें ।।११।। हें सर्व स्कंदचरित ।गणेशवरदानानें सिद्ध होत । शिव तेव्हां मायामोहित । पार्वतीच्या अधीन राही ।।१२।। एकदा पार्वती मैत्रिणींसहित । आपुल्या मनीं गर्व करित । म्हणे मी धन्य धन्य त्रिभुवनांत । शिव माझ्या अंकित असे ।।१३।। मी शिवास सोडून । एकटीच गेलें होतें प्रेमयुक्त मन । परी तेथ अपमान होऊन । अग्निकुंडांत प्राण दिला ।।१४।। पुनरपि हिमाचलाच्या सदनांत । सुता होऊन मीं जन्मत । शंकर मजवरी क्रुद्ध

होत । पर्वतामध्यें निघून गेला ।।१५।। मी तयासी तप करून । गणेशातें आराधून । केला मजवरी प्रसन्न । तेव्हां मोहित तो झाला ।।१६।। तदनंतर स्वयं याचना करित । माझी पत्नीत्वें तो हिमालयाप्रत । त्याची संमति लाभून वरित । प्रेमभरें मजला तैं ।।१७।। प्रथम गेला मज सोडून । पुनरपि करी याचना येऊन । आतां माझ्या तो अधीन । सर्वस्वीं असे नि:संशय ।।१८।। माझी ममता पूर्ण सांप्रत । मानिनीचें रहस्य रक्षित । ऐशा विचारें मनी हर्षित । नगात्मजा ती धन्य मानी ।।१९।। तेव्हां तिच्या सख्या म्हणत । धन्य तूं मानिनी स्त्रियांत । शंकरास जिंकून तप:प्रभावयुत । अधीन त्यास केलासी ।।२०।। हें सख्यांचें ऐकून वचन । जगदंबा जाहली अति प्रसन्न । मनांत गर्व दाटून । हास्य करी मनमोकळें ।।२१।। तिच्या हास्यांतून जन्मला । कामसदृश एक पुरुष भला । मम नामें ख्यात झाला । महाभाग भव्य पर्वतासम ।।२२।। त्यास पाहून देवी विस्मित । आपुल्या मैत्रिणींसमवेत । त्या पुरुषास विचारित । कोण तूं कां येथ आला? ।।२३।। तूं कोणाचा अससी । काय करूं इच्छिसी । पुरुष तेव्हां म्हणे तिजसी । मी तुझा सुत हास्यज ।।२४।। तुझ्या हसण्यातून माझें जनन । झालें आतां करी आज्ञापन । मी सर्व भावें सेवीन । तेव्हां पार्वती म्हणे त्यासी ।।२५।। मी गर्व धरिला मनांत । तदनंतर तूं जन्म घेत । म्हणोनी मम नामा प्रख्यात । माझा पुत्र तूं बहु मानी ।।२६।। गणेशासी भक्तीनें भज। तेणें सर्व इच्छित सफल सहज । त्यायोगें विश्वांत हास्यज । पुत्रा तूं ख्यात होशील ।।२७।। तदनंतर महादेवी देत । षडक्षरमंत्र तयाप्रत । विधियुक्त तो स्वीकारित । प्रणाम करी पार्वतीसी ।।२८।। तदनंतर वनांत जाऊन । तप करी मनीं प्रसन्न । तेथ शंबर दैत्य येऊन । पार्वतीपुत्रासमीप बसला ।।२९।। काळें प्रेरित तो दैत्येश । त्यास मम

म्हणे कोण तूं वीर बलेश । कोणत्या कारणें या समयास । येथ आलास सांग मजला ।।३०।। शंबरासुर त्यास म्हणत । मी येथ आदरयुक्त । आलों विद्या देण्या तुजप्रत । समर्थ या योगें तूं होशील ।।३१।। ऐसें सांगून महादैत्य ममाप्रत । नानाविध विद्या देत । ती आसुरी विद्या समस्त । शिकला पार्वतीपुत्र यत्नें ।।३२।। विद्या सारी साध्य करित । स्वयं कामरूप तो होत । नाना सामर्थ्ययुक्त हर्षित । जाहला मम अत्यंत ।।३३।। शंबरासी करी प्रणिपात । हितकारक वचन बोलत । त्याचा स्वभाव भक्तियुक्त । हात जोडी तो उदारधी ।।३४।। ममासुर तेव्हां म्हणे त्यास । महाभागा महत्कार्यास । आतां शिष्य म्हणून या ममास । स्वीकारी मज बळवंता ।।३५।। आता उपदेश करावा । माझा जीवितक्रम कैसा असावा । शंबर म्हणे गणेशदेवा । आराधी शक्तियुक्त मंत्रानें ।।३६।। मानदा तो प्रसन्न होईल । तुज वर देण्यास प्रकटेल । तेव्हां ब्रह्मांडाचें राज्य प्रबळ । माग त्या महाप्रभूजवळी ।।३७।। तत्त्वसंभूत तत्त्वांपासून । मृत्युभय मजला न कदाचन । ऐसें माग वरदान । दुसरा नको कांहीं वर ।।३८।। ऐसे वर मिळवून । महाभागा ये मम सदनीं प्रसन्न । तदनंतर कर्तव्य तुज लागून । सांगेन मीं परमादरें ।।३९।। ऐसेंचि मी करीन । ऐसें ममासुर बोले वचन । शंबरही हर्षितमन । स्वगृहासी तैं परतला ।।४०।। मम तेथेंच वनांत वसत । दारुण तप आचरित । वारा खाऊन राहत । ध्याई मनीं गजाननासी ।।४१।। ऐसीं दिव्य सहस्त्रवर्षे जात । तेव्हां गणनायक तुष्ट होत । प्राणशेष ममासुराप्रत । वर देण्यासी प्रकटला ।।४२।। गणनाथ उभा पुढ्यांत । परी त्या असुरासी न झालें ज्ञात । ध्यानसंस्थास त्यास म्हणत । यथायुक्त गणाधीश तैं ।।४३।। महाभागा ममासुरा सांप्रत । पहा मीं तुझ्या हृदयांत स्थित । तुझ्या तपानें संतुष्ट । आलों वर देण्यास तुला ।।४४।। तुझ्या मंत्रजपानें

प्रसन्न । तुजसमोर मी गजानन । हें ऐकतां धीरगंभीर वचन । ममानें डोळे उघडिले ।।४५।। पुढ्यांत विघ्नेश्वरास पाहत । तैं त्वरित वरती उठत । त्यास नमस्कार करित । पूजितसे भक्तीनें ।।४६।। पुनरपि प्रणाम करित । स्तोत्र म्हणून स्तवन करित । गणनाथा गणपते तुज मी वंदित । गणपद प्रदात्या नमोनम: ।।४७।। गणरूप प्रधारकासी । विघ्नपते विघ्नरूपासी । भक्तांची विघ्ने हरणकर्त्यासी । इतरांस प्रहारकर्त्या नमन ।।४८।। अनाथांच्या नाथासी । नाथांस नाथपददात्यासी । नाथांच्या नाथरूपासी । ब्रह्मणस्पते नमोनम: ।।४९।। ब्रह्मासी ब्रह्मदात्यासी । ब्रह्मपालका अमेयशक्तीसी । शक्तिरूपधरासी । शक्तींस शक्तिदात्या नमन तुला ।।५०।। शक्तींच्या शक्तिरूपासी । परेशासी परपदप्रदात्यासी । पररूपासी परात्परासी । ज्येष्ठराजा तुला नमन ।।५१।। ज्येष्ठांस परमपदप्रदात्यासी । ज्येष्ठासी ज्येष्ठहीनासी । मातापित्या जगाच्या तुजसी । स्वानंददात्या नमोनम: ।।५२।। विघ्नेश्वरासी अनंतविहारकर्त्यासी । सकलांच्या रक्षण कर्त्यासी । सिद्धिबुद्धिपतीसी । परात्म्या हेरंबा तुज नमन ।।५३।। मी किती करावें स्तवन । योगप्रद एकदंत तूं महान । योगस्वरूप परमार्थभूत पावन । वेदही असमर्थ स्तवन करण्या ।।५४।। शंभू आदि देव योगिजन । जेथ हरले धरिती मौन । ढुंढे तेथ माझें काय ज्ञान । आतां शरण सर्वभावें ।।५५।। धन्य मी असे निश्चित । गजानना तुझें दर्शन घडत । जें अगम्य अलभ्य असत । योगिजनांसी सर्वदा ।।५६।। मी तुझें पावलों साक्षात् दर्शन । कृतकृत्य जाहलों पावन । गणाधीशा जरी वरदान । देण्यास मज तूं उत्सुक ।।५७।। तरी कोणत्याही तत्त्वापासून । अथवा तत्त्वज प्राण्याहातून । मजसी न यावें कदापि मरण । ऐसा एक वर मज देई ।।५८।। जें जें मीं इच्छीन । तें तें सकळ होवो शोभन । आरोग्यादींनी संपन्न । मज करी तूं गजानना ।।५९।।

ब्रह्मांडगोलाचें राज्य मजप्रत । देईं देवा मनोवांच्छित । माझ्यासम संग्रामांत । कोणीही वीर होऊ नये ।।६०।। विघ्नपा सदा विजययुक्त । अजेय शंकरादी देवांप्रत । मज करी गणाधीशा सतत । अमोघ शस्त्रप्रधारक ।।६१।। श्रीगणेश म्हणे ममासुराप्रत । हें दुर्घट सारें तव इच्छित । दैत्येंद्रनायका तथापि देत । भक्तितुष्ट मीं तुजलागीं ।।६२।। जें जें तूं मागितलें । तें तें मीं तुज आज दिलें । हें स्तोत्र तूं रचिलेलें । अत्यंत प्रिय मजलागीं ।।६३।। कामप्रद वाचकासी । तैसेंचि होईल श्रोत्यांसी । यांत संदेह नसे निश्चयेसी । भुक्तिमुक्तिप्रद हें स्तोत्र ।।६४।। ऐसें वरदान देऊन । गणेश पावला अन्तर्धान । ब्रह्मणस्पतीतें वंदून । ममासुर गेला शंबरसदनीं ।।६५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते ममासुरवरप्रदानं नाम तृतीयोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय तिसरा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । कश्यप कथा पुढती सांगत । ममासुर शंबरासी वंदित । सांगे वृत्तान्त समस्त । ऐकून शंबर आनंदला ।।१।। आपुली मोहिनी सुता देत । शंबरासुर त्यास विवाहांत । तिच्या सहवासात रमत । ममासुर कांहीं काळ ।।२।। तदनंतर शंबर शुक्रास भेटत । प्रणाम करून त्या महाभागाप्रत । सांगे सर्व वृत्तान्त । शुक्राचार्य तैं निश्चय करी ।।३।। दैत्येंद्रासीं तो प्रेरणा देत । ते सर्व एकत्र जमत । शुक्र शंबरासमवेत । स्वयं ममासुरापाशीं गेला ।।४।। शुक्राचें होतां आगमन । ममासुर प्रतापी करी वंदन । विनयानें हात जोडून । उभा राहिला समोर ।।५।। शुक्रविप्राचें पूजन करित । प्रणाम करी हर्षयुक्त । त्याची आज्ञा लाभता बसत । आपुल्या आसनीं नम्रपणें ।।६।। तदनंतर दैत्यगणही तेथ

येत । सारे अत्यंत हर्षित । ममासुर सर्वांचें करी स्वागत । यथाविधि त्या वेळीं ।।७।। तदनंतर सर्वांचे मत घेऊन । नीति विशारद शुक्र बोले वचन । ब्राह्मणहस्तें अभिषेक करून । ममासुरासी राजा केलें ।।८।। त्या दैत्याधीशाचें पांच प्रधान । नेमिले महाबलवान । प्रेत काल कलाप भीषण । कालजित् तैसा धर्म हा ।।९।। दैत्य दानवभूप राक्षस । हर्षयुक्त सारे त्या समयास । जयजयकार करिती विशेष । नंतर पातले स्वगृहासी ।।१०।। ममासुर नंतर नगर शोभन । चिंतानाश सर्व शोभायुक्त महान । निर्मी परिखावलयांकित प्रसन्न । विषयप्रिय प्रजा तेथ झाली ।।११।। वर्णाश्रमयुत समस्त जन । निवास करीती तेथ येऊन । दैत्यादि विशेषें सत्ता पावून । शोभले त्या नगरींत ।।१२।। ममासुर राजा त्या सर्वांस पाळित । हर्षभरित अत्यंत । त्यास दोन पुत्र तेजयुक्त । जाहले मोहिनीपासून ।।१३।। समशील ते दैत्य मोदवर्धक । धर्म अधर्म नामें ख्यात । सर्वत्र सदा नि:शंक । पराक्रमी ते विहार करिती ।।१४।। ब्राह्मणांनी त्यांचें नामकरण । केलें होतें शोभन । धर्म अधर्म दोघे समान । वय रूप पराक्रमानें ।।१५।। त्या दोघांच्या संगतींत । ममासुर अत्यंत बळवंत । एकदा सासऱ्याकडून शुक्रास बोलावित । आपुल्या नगरींत ममासुर ।।१६।। प्रणाम करून म्हणे स्वामी मी जगांत । समर्थ प्रसादें तुमच्या अविरत । आतां ब्रह्मांड जिंकीन समस्त । आज्ञा द्यावी महायोग्या ।।१७।। तुझ्या आज्ञावश मी असत । दास मीं जाण विप्रेंद्रा निश्चित । मज उपदेश करावा सांप्रत । सांगा आपुलें मनोगत ।।१८।। कश्यप म्हणे ममासुराचें वचन । ऐकून शुक्रभक्तिही पाहून । तयास सांगे नीति वचन । ऐक म्हणे ममासुरा ।।१९।। ममासुरा गणेशवरदान लाभून । समर्थ तूं असुर महान । गणेशभक्तियुक्त होऊन । जिंक सारें विश्व त्वरेनें ।।२०।। परी एक गोष्ट सांगतों तुजला । दैत्येशा

ती दृढ मनाला । ठसवी तूं आपल्या । द्वेष न करी विघ्नेश्वराचा ।।२१।। कदापि त्याचा अपमान । न करी तूं मदोन्मत्त होऊन । तरी विशेषें राज्यसुख शोभन । भोगशील तूं सर्वदा ।।२२।। तो दैत्यमुख्य तें मान्य करित । हर्षभरें असुरवीरां बोलावित । त्यांना सांगे सर्व वृत्त । आनंदलें समस्त दैत्येश ।।२३।। वाहवा सुंदर हा विचार । ब्राह्मणांसी विचारा अगोदर । मुहूर्त शोभन गुणकर । हल्ला करण्या देवांवरी ।।२४।। तैसा मुहूर्त विचारून । ममासूर करी प्रयाण । अपार सेना घेऊन । चतुरंग बळ राजा ।।२५।। नाना वाहनांत बैसून । दैत्येंद्र ठाकले युद्धा लागून । शस्त्रास्त्रें करीं घेऊन । वीरमुख्य तैं एकत्र आले ।।२६।। महासुरा सन्निध आले । महाबळी ते महावीर शोभले । पर्वत उपटण्या बळ दाविलें । ऐसें अतर्क्य शक्तियुत ।।२७।। प्रधानांसमवेत युद्ध पारंगत । आपुल्या पुत्रांसह बैसत । रथांत ममासुर विजयोत्सुक बळवंत । शोभला अत्यंत तेजानें ।।२८।। द्विपसहित पृथ्वी जिंकण्यास । सरसावले वीर ते त्या समयास । क्षत्रगण सारें जिंकून तयांस । स्ववश त्यांनीं तैं केलें ।।२९।। तदनंतर पाताळ लोकांत । जाऊन शेषास ते जिंकित । महाबळी तो नमत । अतुल शक्तीपुढें त्यांच्या ।।३०।। तदनंतर ते दैत्यैंद्र स्वर्गात । इंद्रावरी चालून जात । सारे अत्यंत क्रोधयुक्त । इंद्रही लढण्या सरसावला ।।३१।। सुरगणांसहित तो सुदृढ । ऐरावतावरी झाला आरूढ । गेला संग्राममंडळा प्रौढ । देववीरांसहित तेव्हां ।।३२।। दैत्येंद्र शस्त्रसंघातें मारिती । सुरेंद्रासी त्वरितगती । इंद्रासी पकडून ते नेती । ममासुराच्या पुढ्यांत ।।३३।। ममासुर इंद्रासनी बैसत । दानवेंद्र त्यास सेवित । तदनंतर सत्यलोकांत । दूत आपला पाठविला ।।३४।। त्याचा मानस जाणून । ब्रह्मदेव गेला पळून । त्याच्या संगें युद्ध भीषण । करण्या न धजे प्रजापती ।।३५।। विधाता विष्णू सन्निध जात । रक्षी

मजला ऐसें विनवित । विष्णू त्यास घेऊन जात । शंभुदेवाच्या शरण तेव्हां ।।३६।। ऐसा जाणून वृत्तान्त । ममासुर प्रतापवंत । कैलासीं सत्वर जात । महेश्वराशी लढण्यासी ।।३७।। शिवलोकीं एकत्र जमत । भानुदेव शक्ति आदि देव समस्त । ते सर्वही विचार करित । निश्चय करिती युद्धाचा ।।३८।। मरणाचा निश्चय करून । शंभुमुख्य सुरेश्वर महान । ममासुराशीं लढण्या भयहीन । प्रिये दिति ते निघाले ।।३९।। सुलोचने दिती ऐक वृत्त । कश्यप तैं तिज पुढें सांगत । ममासुराचेंही सैन्य अपरिमित । सुसज्ज ठाकलें लढावया ।।४०।। देवेंद्रासी मारण्या उत्कंठित । नाना वीर दैत्य सैन्यांत । ऐसे देव असुर सैन्य उद्युक्त । सज्ज झाले लढण्यासी ।।४१।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते शिवममासुरसमागमो नाम चतुर्थोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चौथा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । कश्यप दितीस सांगत । देवांसी पाहतां क्रोधयुक्त । दैत्य विविध शस्त्रास्त्रांनीं भेदित । मर्मस्थानीं देवांसी ।।१।। देवही दैत्य पुंगवांसी हाणिती । अन्योन्यांसी पीडिती । सैन्यें मिसळलीं ऐशा रीतीं । संमोह पडला वीरांसी ।।२।। धुळीचे लोट नभांत उडती । अंधःकार पसरला रणभूवरती । आपुला कोण दुजा कोण हें न जाणती । मारिती पुढ्यांत येई त्यास ।।३।। ऐसे ते दुर्मद ठार करित । आपुल्याही योध्यासी भ्रमयुक्त । एक दिवस दारुण युद्ध चालत । वीरांसही मोहप्रद ।।४।। तदनंतर रक्ताची नदी वाहत । घोर प्रवाह तैं धूळ बसत। त्या रक्तांत ती मिसळत । प्रकाश पसरे रणभूमीवरी ।।५।। तदनंतर संभ्रमांत पडती । विवेक पुनरपि जोडिती । देव दैत्य

त्वेषानें लढती । महोत्साह लाभूनियां ।।६।। दैत्यांच्या सैन्याची सरशी होत । देवसैन्य भग्न होत । दैत्यसंघ त्याचें हनन करित । तेव्हां देवसेना पळाली ।।७।। तैं भैरव मुख्यादि गण जात । विष्वक्सेनादि आदित्यांसहित । कालिमुख्य शक्ती क्रोधयुक्त । असुर सैन्यावरी हल्ला करण्या ।।८।। महास्त्रांचा वर्षाव करिती । दैत्य सैन्यांत पसरली भीती । प्राण वाचवावया असुर पळती । दशदिशांत त्यावेळी ।।९।। तदनंतर क्रोधसमायुक्त । ममासुराचे प्रधान लढत । सुरेंद्रांसी शस्त्रांनी मारित । दैत्य भैरवांचे युद्ध घोर ।।१०।। एक दिवस युद्ध चाललें । घनघोर तेथ लढले । देव दैत्य जय इच्छिते झाले । उभयही रणक्षेत्रांत ।।११।। तदनंतर दैत्येंद्रप्रमुख पडत । रणांत मूर्च्छा येऊन बहुत । असुरसैन्य पळालें भययुक्त । दशदिशांत त्या वेळीं ।।१२।। तें वृत्त ऐकतां ममासुराचे सुत । पित्यास प्रणाम करून जात । लढावया रणांगणांत । तोवरी शुक्राचार्य काय करी ।।१३।। त्यानें संजीवनी जपून । दैत्य वीरांस दिलें जीवदान । ते पुन: जिवंत होऊन । लढण्या गेले त्वेषानें ।।१४।। दैत्यां समवेत शस्त्रास्त्र धर । धर्माधर्म तेव्हां उग्र । देवेंद्रासी मूर्च्छापर । पाडविती रणांत तैं ।।१५।। त्यांचें अस्त्रबल सहन करील । ऐसा देवसेनेंत वीर न प्रबल । म्हणून देव पळाले भयविव्हल । ते वृत्त समजलें शिवासी ।।१६।। तो स्वत: वृषभावर बैसून । अत्यंत क्रोधयुक्त मन । आला रणांगणांत निश्चय करून । मागून जगदंबाही आली ।।१७।। विष्णु सूर्यादि देव येती । ते दैत्यांसवें लढती । रोमहर्षक युद्ध करिती । ब्रह्मांडा भयदायक तें ।।१८।। त्याचें वर्णन शब्दातीत । अधर्म विष्णूसंगे लढत । धर्म शंकरास आव्हान देत । कालजित लढे सूर्यासंगे ।।१९।। प्रेत महाबळ लढत । शक्तीविरुद्ध रोषयुक्त । कलाप कालरुद्रा ललकारित । धर्मघ्न कालीसंगे लढे ।।२०।। ते सारे मर्मभेदक

टाकिती । अस्त्रें एकमेकांवरती । शस्त्रांनी आघात करिती । एक दिन ऐसें युद्ध झालें ।।२१।। देवराक्षसांचे घोर रण । तेव्हां झालें अति दारुण। कालीनें धर्मघ्नाचें केलें हनन । पापी तो तत्क्षणीं मरण पावे ।।२२।। कपालभैरवास पाडिलें मूर्च्छित । त्रिशूळ मारून क्षणांत । काळरुद्र अति बळवंत । शक्ति मारी प्रेतासी ।।२३।। शक्तीच्या खड्गानें तो मरत । त्रिशूळ धर्मातें हाणित । तो पडे होऊन मूर्च्छित । विष्णूनें पाडिलें अधर्मासी ।।२४।। विष्णूचें चक्र ताडण करित । अधर्मासुरासी करी मूर्च्छित । चक्र त्रिशूळांचा पराक्रम अद्भुत । दैत्यसैन्य नाश पावलें ।।२५।। हाहा:कार दैत्येश करिती । शोणिताच्या महानद्या वाहती । छिन्नभिन्न दैत्य पळती । मिळेल त्या दिशेनें तैं ।।२६।। तथापि सुलोचने । शस्त्रवेगानें कांही क्षणांत । तेव्हां ममासुर स्वयं क्रोधयुक्त । संग्राम करण्या पातला ।।२७।। पाहून शिवास पुढ्यांत स्थित । म्हणें तो रागावून तयाप्रत । सर्वसंहारक ऐसा ख्यात । शंकर तो महापराक्रमी ।।२८।। ममासुर म्हणे थांबरे थांब । महादेवा पहा अजब । पौरुष माझें असह्यप्रभ । पाहिलें तुझें सामर्थ्य मीं ।।२९।। ऐसें बोलून महादेवावर । सुदृढ बाण सोडून वार । केला दैत्यनायकें दुर्धर । शंभू फेकी त्रिशूळ तेव्हां ।।३०।। परी ममासुरासी कांहीं न होत । निष्फळ शस्त्रास्त्रें जात । शंभूस बाणांनी ताडित । पाडवी तो धरणीवरी ।।३१।। शंकर पडतां सहसा मूर्च्छित । ममासुर एक बाण तेजयुक्त । सोडून माधवास करी मूर्च्छित । तोही पडला रणभूवरी ।।३२।। शक्ति सूर्य क्रुद्ध होती । असुरावरी बाण दारुण सोडिती । परी ते सारे निष्फळ होती । वरदानानें अजिंक्य असुर ।।३३।। सूर्य शक्तीस हृदयावरी । बाण मारून विद्ध करी । तेही पडले भूवरी । तदनंतर अन्यत्र वळला ।।३४।। महा उग्र बाणवृष्टी करी । देवेंद्रास

देवांस मारी । शंभु मुख्यास मूर्च्छित पाहून सत्वरी । अन्य देव पळून गेले ।।३५।। कांही पडले मरून रणांत । कांहीं भयसमन्वित । दैत्यराज तो अतिहर्षित । महामते त्या वेळीं ।।३६।। शंभुमुख्य देवांस पकडून। गेला स्वस्थाना परतून । शुक्राचार्य देई जीवन । संजीवन मंत्रें दैत्यांसी ।।३७।। प्रधान पुत्र मुख्य झाले जिवंत । तेव्हां तो ममासुर विजयवंत। धर्मास कैलासाधिपति करीत । अधर्मासी विष्णुलोकेश ।।३८।। प्रेतास शक्तिपुरीं नेमिलें । कलापास सौरलोकाधिप केले । वीर धर्मघ्ना ब्रह्मलोकीं योजिलें । कालजितास महेंद्रलोकीं ।।३९।। कालास स्थापिलें यमलोकांत । अन्य दानवांस उचित । त्रैलोक्यांत मोठीं पदें देत । तदनंतर परतला स्वपुरासी ।।४०।। देवेंद्रा शिवादि मुख्यास । भोगावया लाविला कारावास । राज्य करी महाबळ विशेष । ब्रह्मांडाचा अधिप झाला ।।४१।। तो दुष्ट ममासुर मानित । कृतकृत्य आपणांस दैत्येंद्रासहित । स्त्रीमांसमदिरायुक्त । भोगलालस जाहला ।।४२।। आपणांस अविनाशी मानित । देहधारी परी अमरत्व लाभत । अति मदसंयुक्त प्रतापवन्त । ममासुर त्या समयीं ।।४३।। देवांगना नरांगना। पकडून आणी नागांगना । असुरेंद्रांसह त्यांना । पापी निश्चयें भोगी तो ।।४४।। ऐसा बहुकाळ जात । स्त्रीरत्नें अगणित उपभोगित । नंतर दैत्येंद्रास पाठवित । खल तो कर्म खंडनार्थ ।।४५।। वर्णाश्रम कर्में भंगविली । आसुर कर्में सर्वत्र स्थापिली । दंडबळें सक्ती केली । ममासुरानें सर्वत्र ।।४६।। स्वाहा न देवांस मिळत । स्वधा पितरांस नसत । वषट्काराचें नाम नसत । वर्ण संकर जाहला ।।४७।। कांहीं ऋषीस केलें ताडन । कांहींस केलें बंधन । देवस्थानांचें खंडन । करिती दानव सर्वत्र ।।४८।। तीर्थ पुण्यक्षेत्र ते फोडिती । पापें अगणित आचरिती । ममासुराची पूजा करविती । सर्व मानवांकडूनी ते ।।४९।।

दैत्यनाथाच्या प्रतिमा स्थापिती । सर्व मंदिरांत दैत्यां स्तविती । ऐशापरी कर्मनाश जगतीं । दैत्यगणें झणीं केला ।।५०।। हाहा:कार सर्वत्र माजला । सर्व जनगण भ्रष्ट झाला । वर्णाश्रम विहीनतेला । स्वीकारिती दु:खानें ।।५१।। राज्य करी दैत्येश ममासुर । चित्तीं हर्ष त्यास फार। वृष्ट्यादिक सर्वही भयाकुल उग्र । आसुरी कर्मामुळें झाले ।।५२।। ऐसें पाप वाढतां राहत । उपोषणपर देव कारागृहांत । शोकपिडित ते अत्यंत । सत्तेपुढें कांहीं न चाले ।।५३।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते ममासुरराज्यभोगवर्णनं नाम पंचमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पांचवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । कश्यप कथा पुढती सांगत । शंभुप्रमुख देव दु:खयुक्त । ममासुराच्या नाशार्थ करित । सर्व जण ते विचार ।।१।। तेथ विष्णु बुद्धिमंत । म्हणे वाक्य विवेकयुक्त । देवांस समाश्वासन देत । विघ्नराजास स्मरे मनीं ।।२।। विष्णु म्हणे देवांप्रत । आपण पडलों कारागृहांत । कर्मखंडनें उपोषणयुक्त । केलें आम्हां ममासुरानें ।।३।। ममासुराच्या राज्यांत । पाप अतिशय असे घडत । त्यायोगें पुण्यविहीन तो मृत । होईल यांत न संशय ।।४।। वेदवादी वर्णन करिती । सर्वसत्ताधार गणपति । विघ्नराज तो धर्मपालक निश्चिती । त्याची उपासना करूंया ।।५।। आपद्धर्मविधानें पूजन । करितां त्याचें एकमन । तो या ममासुराचें हनन । करील हें सत्य माना ।।६।। देव तत्त्वप्रकाशक । नसे तो जगीं तत्त्वधारक । म्हणोनी मारील यास नि:शंक । वरदान जरी ह्या असे ।।७।। अतिविषयासक्त ममासुर । मोहित होऊन फार । गणेशासी विसरेल तो उग्र । भोगविलासी मग्न

असे ।।८।। विघ्नपाच्याही क्षेत्रांत । त्यानें मूर्ति भंगल्या समस्त । तेथ आपुल्या प्रतिमा स्थापित । पूजवी त्या जनहस्तें ।।९।। आधीं गणपतीचें पूजन । स्मरणादिक त्याचें पावन । करावें हा नियम सोडून । ममासुर स्वच्छंदें राहतसे ।।१०।। म्हणून विघ्नेश्वर कोपयुक्त । मारील यासी निश्चित । त्या देवासी विशेषयुक्त । भावबळें पुजूंया ।।११।। विष्णूचें वचन ऐकून । शंभुपुरोगम देव तोषून । म्हणती वाहवा शोभन । उपदेश केशवा तूं केलास ।।१२।। तदनंतर देव गणेशास ध्याती । संकटमुक्तीची प्रार्थना करिती । मंत्रस्नान आचरिती । न्यासही करिती मनोमय ।।१३।। गणपतीचें ध्यान करून । उपचार अनेक मानस पूजन । मंत्रजपही करिती प्रसन्न । मनापासुनी ते उत्कट ।।१४।। एकाक्षरविधानें युक्त । तप आचरती ते समस्त । भयसंयुक्त ते गुप्त । निराहारपरायण सारे ।।१५।। ऐसीं शंभर वर्षे पूर्ण होत । तैं गणनायक प्रकटत । भाद्रपद शुक्ल चतुर्थीस देत । दर्शन माध्यान्हीं वरद तेव्हां ।।१६।। त्यास पाहुन हर्षभरित । देव उठून सत्वर नमित । पूजिती विविध उपचारें एकदंत । मानसपूजायुक्त ते ।।१७।। पुनरपि प्रणाम करून । भक्तिभावें हात जोडून । आनंदाश्रुयुक्त नमन । देव स्तविती नम्रकंधर ।।१८।। विघ्नराजासी भक्तविघ्नविदारणासी । अभक्तांस विघ्नदात्यासी । गणेशासी परेशासी । हेरंबासी नमन असो ।।१९।। चतुर्बाहुधरासी नागेशध्वजासी । अमेयासी अप्रतर्क्यासी । सदा स्वानंदवासीसी । ब्रह्मपतीसी नमन असो ।।२०।। ब्रह्मदात्यासी सांख्यासी । बोधरूपासी पुरुषासी । परात्म्यासी गणेशासी । प्रकृतीसी त्रिगुणासी नमन ।।२१।। स्रष्ट्यासी पात्रासी संहर्त्यासी । प्रकाशरूपधारकासी । मायिकां नानामायाप्रचालकासी । त्रिलोकस्थासी नमन असो ।।२२।। मोहकासी मोहदासी । विशेषें तुज मायिकासी । नानाभेदमयासी ब्रह्मासी । विघ्नयुक्ता तुज नमन ।।२३।। तेथ आनंदयुतासी ।

समभावासी सर्वभेदविहीनासी । ब्रह्मामृतमयासी । भेदहीनासी नमन असो ।।२४।। शास्त्रप्रमाणानुसार । भेदहीन तो विघ्नकर । भेदयुक्त गजवक्त्र। गणाधीशा तुज नमन ।।२५।। तूं भेदयुक्त भेदहीन सृजिले। द्वंद्वमय नाथा जें झालें । त्यांच्या स्वामित्वें भलें । रूप शोभलें तुझें नमन ।।२६।। आनंद तूं परम ब्रह्म । विघ्नहारक सर्वोत्तम । प्रदायक तत्त्व तूं अभिराम। विघ्नराजा नमन तुला ।।२७।। आज विघ्नराजा तुज अप्रमेयास । चर्मचक्षूनें पहातों विशेष । धन्यत्व गणाधीशा आम्हां सर्वास। तुझ्या पदांच्या दर्शनानें ।।२८।। ऐसें बोलून प्रणाम करिती । शंभुमुख्य देव त्यास प्रीती । तो विघ्नेश भक्तितुष्ट तयांप्रती । म्हणे वर मागा इच्छित ।।२९।। महादेवांनो जो जो मनांत । असेल इष्ट हेतू तो सांगा त्वरित । मीं स्तोत्रसंतुष्ट तपतोषित । ध्यानतुष्ट देईन सारें ।।३०।। तुम्हीं रचिलेलें हें स्तोत्र । सर्वसिद्धिप्रद पवित्र । पाठकां वाचकां सर्वत्र । देवांनो देईल वांछितार्थ ।।३१।। गणेशाचें वचन ऐकून । हर्षभरित देव करिती वंदन । हर्षगद्गदस्वरें वचन । म्हणती अचल दे भक्ति तुझी ।।३२।। तुझ्या पायीं दृढ भक्ति लाभतां । विघ्नविहीन आम्ही तत्त्वतां । शांति लाभून स्वचित्ता । योगी जेणें सिद्ध होती ।।३३।। ममासुरासी नाथा मारावें । सर्वांसी पीडाप्रद जो स्वभावें । धर्मध्वंसकरासी संहारावें । वर्णसंकरकरासी त्या ।।३४।। त्यास दिलें जें वरदान । त्यायोगें तो बलिष्ठ होऊन । आम्हांस केलें बंदीजन । उपोषणपर आम्हीं आतां ।।३५।। ऐसें त्यांचें ऐकून वचन । विघ्नराज प्रतापवान । तथाऽस्तु ऐसें वरदान । देऊन म्हणे मीं करीन हें ।।३६।। ह्या कालावधीत देवि आश्चर्य । घडलें स्वर्गीं चित्रमय । दैत्य जे पहारा करिती निर्दय । देवांवरी ते पहात होते ।।३७।। देवांचें पूजनादि पाहत । जाऊन कथिती सर्व वृत्तान्त । गणेश आगमन निवेदित । म्हणती विघ्नपती आला असे

।।३८।। ममासुरासी ते सांगती । देवांनी आराधिला स्वचित्तीं । तो आला असे गणपति । त्या विघ्नपतीसी नमूनियां ।।३९।। देव त्या महेशासी स्तविती । आपल्या वधार्थ प्रार्थिती । ह्या गणनाथानें सांप्रती। वरदान तैसें दिले त्यांना ।।४०।। आतां हें वृत्त ऐकून । प्रभो काय करायचें तें ठरवून । त्वरित करावें आचरण । अन्यथा अनर्थ ओढवेल ।।४१।। त्यांचें तें वचन ऐकून । क्रोधें आरक्त ममासुर होऊन। सर्व असुरांस बोलावून । सांगे वृत्त तें विस्तारानें ।।४२।। तें ऐकून भयभीत । जाहले ते संभ्रमयुक्त । त्यास वंदन करून सांगत । सल्ला स्वहिताचा त्या वेळीं ।।४३।। दैत्येंद्र तयास सांगती । देव कारागारीं सांप्रत असती । ते कैसा आराधिती । गणनायक हें न कळे ।।४४।। त्यानेंही संतुष्ट होऊन । ऐसें दिले वरदान । हें सर्व अशक्य स्वप्न । तत्त्वमय तैं पाहिला ।।४५।। पहारेकरी जे दैत्यवीर । पाहिला म्हणती विघ्नेश्वर । ते तत्त्वमयासीच निर्धार । पाहते जाहले असावे ।।४६।। कारण जे तत्त्वहीन । त्याचें कैसें होय दर्शन । म्हणून त्याचें देवांसह हनन । सहज आम्ही करणार ।।४७।। तुम्हांसी तो विघ्नेश काय करणार। मृत्युवर्जित आपण उग्र । जें जें तत्त्वमय असेल समग्र । त्या त्यापासून अभय असे ।।४८।। ऐसें बोलून नाद महाभयंकर । करिती ते असुरवीर । देवादींसमीप शस्त्रास्त्रधर । ते निघाले जावया ।।४९।। एवढ्यांत पुनरपि आश्चर्य घडत । नारद गेला विघ्नराजाप्रत । प्रणाम करून त्यास स्तवित । गायन करी आनंदें ।।५०।। तदनंतर त्यास विनवित । ममासुरासी मारावें सांप्रत । परी गणराज त्यास पाठवित । समेट करण्या दैत्यांशी ।।५१।। विघ्नराजाची नीति जाणत । नारद तोषला मनांत । प्रथम सामोपचार करित । गजानन त्या वेळीं ।।५२।। नारद गजाननाचा दूत । गेला ममासुराकडे त्वरित । पुढे काय घडला

वृत्तान्त । पुढिल्या अध्यायीं तें वर्णन ।।५३।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते विघ्नराजप्रादुर्भावो नाम षष्ठोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सहावा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । कश्यप सांगे पुढील वृत्त । नारद ममासुरास भेटत । तेव्हां तो दैत्य राजा पूजित । आदर सत्कार करी त्याचा ।।१।। आगमन कारण विचारित । तैं नारद त्यास सांगत । आपद्धर्मविवेकें सांप्रत । आराधिला गणेश देवे ।।२।। तो वरद देवांस सिद्धिप्रद । तुझ्या वधार्थ सर्वद । प्रार्थिला देवें विशद । त्यानें दिलें वरदान तैं ।।३।। त्यानें पाठविलें तुजप्रत । सामोपचार करण्या सांप्रत । माझें वाक्य ऐक एकचित्त । तेणें हित होईल तुझें ।।४।। विघ्नें सत्तात्मक असत । त्यांची सत्ता त्रिविध ख्यात । सत्य संकल्पा रूपा वर्तत । पराधीना भाविका तशी ।।५।। सत्यसंकल्प सत्तेचा धारक । जे असती ब्रह्मवाचक । तें परमेश्वर स्वाधीन निःशंक । प्रभाव त्यांचा अगम्य ।।६।। अन्य नरादी ख्यात । सत्तावंत तेही असत । ते दैवाधीन समस्त । दैवसत्ता त्या वरती ।।७।। तूं वर लाभून समर्थ । स्वसत्तायुक्त नसत । वरसत्तात्मक दैत्य येथ । पराधीन निःसंशय ।।८।। पराधीन जे असती नर । त्यांस सर्वदा भय घोर । वृथा विघ्न गर्व वाहून फार । अन्ती होती सत्ताहीन ते ।।९।। मीच ब्रह्म या मोहानें मोहित । जगदीश्वर मानिती श्रेष्ठ । आपणांस म्हणती विश्व वर्तत । माझ्याचि आधारें सर्वदा ।।१०।। आमच्याहून श्रेष्ठ नसत । अन्य कोणीही विश्वांत । ऐसें म्हणती ते तेव्हां होत । सत्ताहीन तत्क्षणीं ।।११।। सत्यसंकल्प जयांची सिद्धि । आकर्षण करी विघ्नप आधीं । म्हणून विघ्नयुत प्रसिद्धि । द्विविध जाण

ममासुरा ।।१२।। सत्यासत्यमय असत । द्वंद्वमायाविमोहित । ते सर्व विघ्नयुक्त वर्तत । देत्यराजा नि:संशय ।।१३।। ब्रह्म ते आनंद परम । समात्मक द्वंद्वहीन अभिराम । द्वंद्वांत द्वंद्वभावें मनोरम । परी तें मोहवर्जित ।।१४।। तेंच विघ्नराजाख्य वर्णिती । ब्रह्म वेदांत आणि श्रुती । देवें आराधिले भावभक्ती । देहधारी म्हणोनि झाला ।।१५।। आतां तो देवागारांत । प्रकटला असे देव अद्भुत । त्यास शरण जा त्वरित । अन्यथा मरण ओढवेल ।।१६।। स्वधर्मयुत विश्व समस्त । दैत्यपा होवो हें त्वरित । तूही स्वधर्मनिरत । जाई आपुल्या स्वकीय स्थानीं ।।१७।। स्वर्गभोगकर देव ख्यात । मनुष्य भूमिस्थित ज्ञात । दैत्य पाताळ लोकांत । सुखानें राहोत सर्वदा ।।१८।। वर्णाश्रमयुक्त जन । राहोत नित्य धर्म पाळून । ऐसें आचरण करून । ममासुरा भोग भोगी ।।१९।। एवढ्यांत आकाशवाणी होत । दैत्येंद्रा गर्व धरू नको चित्तांत । नारदाच्या आज्ञावश वाग त्वरित । अन्यथा मरण ओढवेल ।।२०।। विघ्नपति अन्यथा कुपित । तुज वधील निश्चित । त्यासी शरण जा अविलंबित । सर्वसिद्धिप्रदायक जो ।।२१।। ममासुर ती दिव्य वाणी ऐकत । अशरीरिणी जी अद्भुत । तेव्हां अत्यंत खेदयुक्त । शुक्राचार्यांसी भेटला ।।२२।। त्याच्याशी विचारविनिमय । करी तो ममासुर वाटून भय । शुक्रही सांगे हितावह होय । शरण जाणें विघ्नेशासी ।।२३।। शुक्रही तैसेच सांगत । तेव्हा तो असुरेश भययुक्त । नारदास वंदून म्हणत । हितकारक ऐसें वचन ।।२४।। ममासुर म्हणे नारदा सांप्रत । तूं जें मज कथिलें हित । तेंचि शुक्राचार्य सांगत । देवांसी जें हितकारक ।।२५।। त्या गजाननासी मी सेविलें । अति उग्र तपें स्तविलें । महामुने मज सोडून केलें । देवांसी कां जवळ त्यानें ।।२६।। म्हणोनि आता न जाईन । गजाननासी मी शरण । मानी जन स्वीकारिती मरण । शरण न कदापि शत्रूसी ।।२७।।

त्याचें तें ऐकून वचन । नारद बोले सामवचन । चिंता दैत्येंद्रा न करी उन्मन । हा देव नसे पक्षपाती ।।२८।। जेव्हां देव मदोन्मत्त । पूर्वी वधिती दैत्य संघ प्रमुदित । दैत्यांचें मूळ नष्ट करण्या जात । पाताळांत ते ज्या वेळीं ।।२९।। त्या वेळीं हा वरद होऊन । दैत्यांसी देई सामर्थ्य महान। देवांसी मदविहीन । करी पराजित करूनिया ।।३०।। तूं मोहांत पडलास। गणपतीस त्यागिलेंस । कर्मनाश करून सर्व देवांस । मारण्या उद्युक्त जाहलास ।।३१।। कर्मनाश होतां देव विनष्ट । विश्व निर्देव होईल अत्यंत । म्हणून तुज मारण्या येत । विघ्नराज महा असुरा ।।३२।। जें जें स्वधर्मानुसार । राहताती जगीं थोर । त्यांना ब्रह्मनायक न विघ्नकर । त्यां हनन न करी तो ।।३३।। सुर तैसे असुर ह्यांच्यांत । सिद्धिबुद्धि म्हणोन विहार करित । सिद्धिबुद्धिवाचून जगांत । काय करशील तें सांग ।।३४।। विघ्नराजाचें विघ्न सहत । ऐसा कोण असे समर्थ । त्यास विघ्न करण्यास शक्त । मूर्खभावें तूं नित्य ।।३५।। ऐसें करतां मरशील निश्चित । आनंद ब्रह्म वेदप्रोक्त । सदसन्मय न तत्त्वसंयुत । दैत्या तो असे सर्वातीत ।।३६।। तो न तत्त्वसंयुत न तत्त्वहीन। सर्वत्र योगभावें राहून । सर्व द्वद्वांचें करी धारण । केवळ क्रीडा करावया ।।३७।। जेव्हा देवादिक प्राणी गर्व करिती । स्वधर्म सोडून मोहांत फसती । जेव्हां जन स्वच्छंदें वागती । सर्वत्र पसरे अनाचार ।।३८।। तेव्हां हा देव देह धरित । मदनाशक अवतरत । गणेशाचा देह असन्मय असत । सन्मय त्याचें मस्तक ।।३९।। म्हणोनि हा गजमस्तक । झाला त्यास शरण जा नि:शंक । नारदाचें वचन ऐकून पावक । शुक्राचा उपदेश स्मरे ।।४०।। आकाशवाणीही आठवित । तेव्हां मनांत निश्चय करित । गणेश हा ब्रह्मरूप वर्तत । स्वानंदांत निवास त्याचा ।।४१।। त्यास शरण मी जाईन । त्यायोगें स्वहित साधीन ।

विघ्नराजाचा अनादर करून । कोण जगूं शकेल ।।४२।। सिद्धिबुद्धिपती प्रभूस । अवमानून मदयुक्त खास । विघ्नविहीनता कैसी त्यास । ब्रह्मांडमंडळीं सर्वत्र ।।४३।। स्वयं समस्त दैत्यांप्रत । हितावह वचन सांगत । ममासुर प्रसन्नचित्त । गणेशावरी जडे ममता ।।४४।। ममासुर म्हणे दैत्यांप्रत । कालमुख्यादि वीर हो सांप्रत । प्रिय मित्रांनो वचन हितयुक्त । ऐका लक्ष देऊनियां ।।४५।। हा हितोपदेश नारदानें । तैसाचि केला दैत्यगुरूनें । तेंच सांगितलें आकाशवाणीनें । तैसेंचि मी करीन आतां ।।४६।। त्याचें ऐकून वचन । धर्म अधर्म बोलती विनीतमन । जगदीश्वरा देवपक्षपात्यास शरण । जाणें अयोग्य वाटतसे ।।४७।। रणांत मरण स्वर्गप्रद । ऐसें सांगती शास्त्रज्ञ सुखद । म्हणून लढूंया विशद । विघ्नेशासवें विशेषें ।।४८।। देहधारी गजानन । काय करील सांगा विघ्न । ताता मायामोहीं फसवून । बुद्धिभ्रंश हा देव करिती ।।४९।। नारद असे गणराजभक्त । त्याचा उपदेश कैसा संमत । दैत्येंद्रासह महामते सांप्रत । करितां आपण सारे अहो ।।५०।। नारदाचें मन राखण्यास । काव्य शुक्राचार्य आपणास । तोच करिती उपदेश । आकाशवाणी ही देवमाया ।।५१।। ती सर्व वृथा असत । भय न बाळगावें मनांत । गजानन नाना तत्त्वयुक्त । स्वप्रतापें वधूं त्यासी ।।५२।। दैत्यप्रपालका तुझें बल । कैसें झालें आज निर्बल । ऐसें बोलून ते दोन वीर बाल । देवांस मारण्या निघाले ।।५३।। रथावरी आरूढ होती । अत्यंत गर्व त्यांच्या चित्तीं । डोळ्यांत क्रोधज्वाला पेटती । ममासुर त्यांस थांबवी ।।५४।। नका जाऊं ऐसें सांगत । परी त्याचें वचन न ऐकत । ते दुर्मद धर्माधर्म जात । गणेशास मारण्यासी ।।५५।। तदनंतर गणेश्वराप्रत । नारद विप्र तैं जात । त्यास सांगे समग्र वृत्तान्त । गणेशही संतापला ।।५६।। देवांस भयभीत पाहत । गणनायक तेव्हां सांगत ।

भय बाळगूं नका मनांत । ममासुरास मारीन मीं ।।५७।। अमोघ शस्त्रबळयुक्त । स्वयं ममासुर जरी येत । तरी त्यास मारीन निश्चित। हें जाणा माझें आश्वासन ।।५८।। ऐसें बोलून गजानन । आपल्या करातलें कमळ सोडून । ब्रह्मरूपक महास्त्र जें भीषण । असुर संहार इच्छितसे ।।५९।। तें कमळ एका क्षणांत । दैत्य सैन्यावरी पडत । त्याचा सुवास पसरत । पृथ्वी तळावर झणीं ।।६०।। गणेशाचा जे द्वेष करित । त्यांस तो सुवास ठार करित । परी द्वेषहीन जे असत। त्यासी तो अद्भुत मधुर वाटे ।।६१।। त्या कमलाचा सुवास घेती । धर्म अधर्म रणीं पडती । त्यांच्यासम पंचप्रधान मृत होती । हाहा:रव घोर माजला ।।६२।। दैत्य पाताळांत पळती । कमल क्रुद्ध तें द्रुतगती । ममासुराजवळी युद्धक्षेत्रीं । जाऊन सुवास त्यास देई ।।६३।। त्यायोगे ममासुर मूर्च्छित । जाहला तेथ रणांगणांत । परी प्रहरार्धानें जागृत । सावधान तो झाला ।।६४।। त्यानंतर तो काय करित । हें वाचा पुढील अध्यायांत । सीताराम भक्तिभावें अनुवादित । गणेशसुत हें गोड माना ।।६५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते ममासुर गर्वहरणं नाम सप्तमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सातवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । कश्यप कथा पुढती सांगत । ममासुर जेव्हा सावध होत । समीप कमळ पाहून भयभीत । गर्वहरण त्याचें झालें ।।१।। तो त्या कमळा करी वंदन । करपुट भीतीनें जोडून । स्तोत्र म्हणे भावयुक्त मन । ममासुर कमळास स्तवी ।।२।। कमळा तुजसी माझें नमन । गणेशशस्त्रांत प्रमुख मान । तुजला असे शोभन । वासनांच्या परेशा वंदन

तुला ।।३।। सुवासधारकासी अभिवादन । विषयांत सुवास निर्मून । मोहविसी प्राणी संसारांत गुंफून । सुखदुःखयुक्त ते होती ।।४।। जे योगवासनेनें युक्त । ते होती ब्रह्मभूत । वासनांचा भेद बहुविध असत । किती त्यांतले वर्णावे ।।५।। त्यातल्या ब्रह्मस्वरूपासी । खेळकरा नमितों तुजसी । विश्व कमलसंभूत त्यासी । पद्माकार वर्णिती जन ।।६।। शस्त्रोत्तमा तुझें वर्णन । करील पूर्णत्वें कोण । नमन करितों हो प्रसन्न । रक्ष मजला भयांतून ।।७।। दैत्येश ऐसी स्तुति गात । तैं तें कमळ शांत होत । गणराजाच्या हातांत । परतलें तें प्रसन्नपणें ।।८।। ममासुर प्रसन्नात्मा जात । शुक्रासहित विघ्नराजाप्रत । त्यास भक्तिभावें वंदित । पूजा करी तयाची ।।९।। पुनरपि हात जोडून । स्तुती करी संतुष्टमन । ब्रह्मनायकाचें स्वरूप जाणून । ममासुर त्या समयीं ।।१०।। विघ्नेशासी अनादीसी । सर्वसत्ता प्रचालकासी । परेशासी ब्रह्मेशासी । गणेशासी नमो नमः ।।११।। गणांच्या चालकासी आनंदासी । सदा आनंददायकासी । हेरंबासी एकदंतासी । शूर्पकर्णासी नमन असो ।।१२।। ढुंढीसी लंबोदरासी । भक्तपालकासी स्वानंदपतीसी । योगाकारस्वरूपासी । शांतिस्था तुज नमन असो ।।१३।। शांतींना शांतिदासी । ज्येष्ठराजासी पूज्यासी । सर्वांच्या सर्वनायकासी । विनायका तुज नमन असो ।।१४।। देवदैत्यांच्या पालकासी । आदिपूज्यासी अव्ययासी । अन्तीं अवशिष्ट तूंच राहसी । सिद्धिबुद्धिपते नमन तुला ।।१५।। चतुर्भुजासी नागेशध्वजासी । शेषावरी संस्थितासी । गजाननासी देवेशासी । दैत्येशरूपा तुज नमन ।।१६।। भक्तांचीं विघ्नें हरण करिसी । अभक्तांसी विघ्नांनी ताडिसी । योग्यांच्या हृदयस्थ समभावासी । नानाभेदमया तुज नमन ।।१७।। ब्रह्म असद्रुप वेदवेदोक्त । भेदहीन सद्रूप ख्यात । त्यांच्या साम्यें तूं विलसत । सम

स्वानंदसंस्थित ।।१८।। त्या प्रभूस कोण सत्यार्थे जाणत । धन्य मीं एक जगतांत । जेणें गजानन पाहिला पुढ्यांत । प्रत्यक्ष महद्भाग्यानें ।।१९।। गणेशा किती करूं स्तवन । वेदादीही जेथ धरिती मौन । योगिजन शांति लाभून । रममाण होतात स्वानंदीं ।।२०।। ऐसी स्तुति करून । ममासुर करी नर्तन । रोमांचित शरीर अश्रुपूर्ण नयन । सौभाग्यशाली तो होत ।।२१।। महाभक्तियुक्त तयाप्रत । विघ्नप्रनायक सांगत । महाबाहो वर माग इच्छित । देईन स्तोत्रें तुष्ट मीं ।।२२।। तूं रचिलेंलें हें स्तोत्र उत्तम । नाना कामपूरक अभिराम । निष्कामांस महामोक्ष शोभन । मिळेल याच्या वाचनानें ।।२३।। माझी भक्ति दृढ होईल । हृदयांत भाव ठसेल । ऐसें हें स्तोत्र विमल । ममासुरा जाण निश्चयें ।।२४।। विघ्नेशाचें ऐकून वचन । ममासुर करी वंदन । भक्तिसंयुक्त हात जोडून । प्रार्थी देवा गजाननासी ।।२५।। जरी प्रसन्न होऊन । वर देण्यास आला आनंदून । तरी स्थिर भक्ति देऊन । मायेचा नाश करावा ।।२६।। गाणपत्यांचा सहवास । देई नाथा निरंतर भक्तीस । माझें स्थान भक्ष्यादिक सुरस । सांग ढुंढे मजला तूं ।।२७।। मी गणाधीशा तुझा दास असत । अन्य वर मी न वांछित । तुझ्या दर्शनमात्रें हृदयांत । ज्ञानोदय जाहलासे ।।२८।। विघ्नेश तेव्हां वर देत । माझी दृढ भक्ति तुझ्या मनांत । सदैव नांदेल ममासुरा निश्चित । तूं होशील गाणपत्यप्रिय ।।२९।। स्वस्थानीं निर्भय होऊन । मत्परायण राहून । जे कोणी स्वधर्मविहीन जन । कर्म त्यांचें भक्षण करी ।।३०।। जेथ प्रथम न करिती माझें पूजन । अथवा माझें पुण्य स्मरण । ऐशा जनां मोहवून । राज्य करी त्यांच्या हृदयांत ।।३१।। परी माझ्या भक्तांचे दासत्वें रक्षण । करी तू स्नेहभावपूर्ण । माझ्या भक्तिभावें विहीन । त्यांस ममताबद्ध करी ।।३२।। ऐसें विघ्नेश्वराचें वचन । ऐकून आज्ञा उत्तम प्रसन्न ।

आनंदला ममासुर विनीतमन । म्हणे तव आज्ञा पाळीन ।।३३।। त्यास प्रणाम करून । मम असुर गेला परतून । आपल्या स्थानीं राहून । शांति मानसीं धारण करी ।।३४।। सर्वदा गणेशाच्या भजनांत । जाहला सर्वभावें रत । दैत्येश त्याचा संग सोडित । भयभीत सारे होऊनी ।।३५।। ते सर्वही पाताळ विवरांत । पुनरपि तेव्हां प्रवेशत । त्यांचा वियोग होतां हर्षभरित । ममासुर जाहला ।।३६।। ऐशापरी ममासुरास शांत । विघ्ननायक करी प्रेमयुक्त । स्वाधीन करोनि स्वस्थानीं स्थापित । दिति प्रिये त्या समयीं ।।३७।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते ममासुरशांतिवर्णनं नामाष्टमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय आठवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । कश्यप पुढती सांगत । ममासुर शांतियुक्त होत । देव तें पाहून हर्षित । मुनिजनांसह वंदिती ।।१।। विघ्ननायकासी पूजिती । रोमांच उठले अंगावरती । भक्तीभावें कर जोडिती । स्तवन गाती आदरानें ।।२।। देवर्षी तेव्हां स्तोत्र म्हणती । विघ्नराजाचें रूप वर्णिती । साम्य स्वरूप जो जगतीं । द्वंद्वविहीन परमार्थभूत ।।३।। द्विविधांत राहून विरक्त । आनंदनाथ निजभक्त स्तुत । त्यांसी सदा जो पोषित । त्या विघ्नराजा सतत भजतों ।।४।। भेदविहीन अप्रमेय । परम श्रेष्ठ जो साक्षिमय । विनायकत्व ज्याचें अभेद्य । त्या विघ्नराजा सतत भजतों ।।५।। सदैव तूं समभाव स्थित । परी सृजिलें भेदयुत । द्वितीय ब्रह्म लीला कारणें जगांत । उत्थान रूप तूं अससी ।।६।। जेव्हां परेश मायामोहयुक्त । अन्योन्य एकमेका भेटत । प्रकाशरूपें तूं वसत । विमोहशून्य सर्वकाळ ।।७।। तूं प्रेरिसी द्वंद्वमय पर । सोऽहं तैसा बिंदु

अमर । त्यांत समत्वें राहून करिसी विहार । विघ्नराजा तुज भजतों आम्हीं ।।८।। अहंकार बिंदूस जोडून । विश्व रचिलें चतुष्पादमय पुराण । तेथेच नाथा प्रकाशसी महान । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।९।। ऐशापरी स्वतोत्थान बळें खेळत । साम्यरूपें तूं जगांत । परी तद्भावशून्य वर्तत। विघ्नराजा तुज सतत भजतों ।।१०।। ऐसा परेशाधिपति निर्मित। गणराजा तैसा तूं न भासत । सांख्यस्वरूप वेदप्रशंसित । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।११।। सांख्य तो दोषविहीन । ऐसें म्हणती विद्वज्जन । म्हणोनि उत्थानहीन । सांख्यसंस्थ तूं न कदापि ।।१२।। स्वानंदवासी गणनायक । आनंदरूप तूं सौख्यप्रतीक । तदात्मशून्य द्वन्द्वप्रकाशक । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।१३।। नित्य मनोवाक्प्रभावें हीन । साम्यात्मक सुयोगें शोभन । लक्ष्य तूं सदानंदघन । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।१४।। जयाचें करण्या पूर्ण स्तवन । वेदही असमर्थ झालें उन्मन । त्या हेरंबा आद्यास वंदन । करितों तुज देवदेवा ।।१५।। तूं संतुष्ट होई सर्वात्मक । योगींद्रमुख्य तुझें सेवक। ऐसें सांगून भजत ध्यानैक । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।१६।। त्यांच्या मनोभक्तिभावरक्षणार्थ । तूं होसी देहधारी समर्थ । तेथेंच भक्तिभावें सुभक्त रमत । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।१७।। देह तुझा असद्ब्रह्ममय । सद्रूप गजवाचक तोंड सदय । त्यांचा योग होतां पावसी उदय । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।१८।। करि-आनन तुज म्हणती । योगमया तुज हृदयीं पाहती । सिद्धिप्रद बुद्धिचालक जगतीं । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।१९।। ब्रह्मा मीं माझ्या सर्व अधीन । विश्वादिक म्हणती ब्रह्मगण। तुझ्या मायेनें मोहित होऊन । विघ्नराजा तुज भजतों आम्हीं ।।२०।। त्यांस सत्ताविहीन करिसी । विघ्नप्रदानें महानुभावा पीडिसी । स्वार्थविहीन ते जात पूर्णत्वासी । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।२१।।

तुझ्या अंघ्रिकमलाचा आश्रय । शरण येऊन घेती सभय । तेव्हां विघ्न जाऊन ते निर्भय । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।२२।। ऐशा विघ्न पतीचें स्तवन । करण्या असमर्थ आम्हीं जाण । वेदही धरिती जेथ मौन । तर्कातीत अलभ्य तूं ।।२३।। योगमय म्हणून होऊन । तुझें करूं नित्य मनन । गजानना करी रक्षण । विघ्नराजा तुज सतत भजतों ।।२४।। कश्यप म्हणे दितीप्रत । ऐसी स्तुति करून नमत । देवऋषि संतुष्ट करित । स्तवन करून बहुविध ।।२५।। त्यास तेव्हां ब्रह्मपति म्हणत । विघ्नेश देवर्षींनो सांप्रत । वर मागा महाभागांनो त्वरित । मनोवांछित जे असे ।।२६।। या स्तोत्रानें संतुष्ट । देईन मी भक्ताधीन जगांत । तुम्हीं रचिलेलें हें स्तोत्र सतत । होईल सर्वार्थदायक ।।२७।। जो हें वाचील वा ऐकेल । भाव ठेवून श्रद्धामय अमल । तो सर्व सुखें पावेल । विद्या धन धान्य यश ।।२८।। धर्म अर्थ काम मोक्ष । ब्रह्मभूय त्यास करीन दक्ष । पुत्रपौत्रादिक ऐहिक सुख । आरोग्य उत्तम त्यास लाभे ।।२९।। युद्धकाळीं हें स्तोत्र वाचित । त्यास युद्धांत विजय लाभत । मारण उच्चाटन तंत्र होत । सिद्ध हें स्तोत्र वाचूनियां ।।३०।। परकृत्याचें प्रशमन होत । मरणभय सारें विनष्ट । कारागृहपीडा संपत । ह्या स्तोत्राच्या वाचनानें ।।३१।। ह्याचें सहस्रावर्तन । अथवा एकवीस वेळा वाचन । करिता एकवीस दिवस भावपूर्ण । ऐकतांही भक्तीनें ।।३२।। मनोवांछित सर्व लाभत । माझी भक्ति मनांत वाढत । अपराधादिक सारे विनष्ट । होतील निरंतर हें वचन माझें ।।३३।। ऐसें गणपतीचें वरदान । ऐकून म्हणती देव ऋषिजन । भक्तिभावपूर्ण वचन । विघ्नेशा ऐक प्रार्थना ।।३४।। जरी प्रसन्न तूं आम्हांवर । पदांबुजाची तव भक्ति दे निर्भर । आम्हां नको अन्य वर । ममासुरास तूं शांत केलें ।।३५।। आतां आपापल्या स्थानांत । स्वर्गस्थ देव जातील बळयुक्त । मुनिजन स्वकर्मे आचरित ।

स्वधर्मपालन करतील ।।३६।। गणाध्यक्षा अन्य काय मागावें । वरदान काय बरवें । विघ्नविदारणा जें व्हावें । त्याचें फळ आधींच दिलेस ।।३७।। तथाऽस्तु म्हणून अन्तर्धान । पावले देव गजानन । देव मुनिजन त्यास नमून । खेदयुक्त मनीं विरहें त्याच्या ।।३८।। गणाध्यक्षाची मूर्ति स्थापिती । हिमाचलाच्या मध्यें स्थान वर्णिती । विघ्नपतीसी तेथ पूजिती । उत्तर दिशेस हें क्षेत्र ।।३९।। भाद्रपद शुक्ल चतुर्थी असत । माध्यान्ही मूर्ति तेथ स्थापित । देव सर्व मुनिगणां सहित । सर्व सुखावह विघ्नेश ।।४०।। विघ्नपति मध्यें विराजित । वामांगीं सिद्धि स्थित । बुद्धी दक्षिणांगीं वर्तत । नागेश पुढें उभा असे ।।४१।। पृष्ठभागीं प्रयागादी क्षेत्रें असतीं । विघ्नराजाच्या सेवेस्तव तीं । अति उत्सुक नित्य राहती । डावीकडे शंभु आदि देव ।।४२।। उजव्या बाजूस मुनीश्वर । पुढ्यांत असुर नागमुख्य गंधर्व वर । अप्सरा नाना सिद्धगण उदार । सुलोचने वसती सेवनोत्सुक ।।४३।। गंगादी नद्या तेथ भक्तियुक्त । अन्यही जन राहत । दहा योजनें विस्तार ख्यात । या क्षेत्राचा मुख्यत्वें ।।४४।। हें चौकोनी महाक्षेत्र ज्ञात । सुखप्रद जगतांत । तेथ गणेशतीर्थ विशेषयुत । सर्वसिद्धिप्रदायक ।।४५।। स्नानमात्रें प्राण्यांस प्राप्त । भुक्तिमुक्ति गणेश तीर्थांत । अन्य विष्णुमुख्य देवांचीही तेथ । तीर्थें तैशीं योग्यांचीं ।।४६।। स्नान करितां त्या तीर्थांत । सायुज्य आपापलें तीं देत । अन्य देवादिकांचे जे भक्त । ते जरी दिवंगत या क्षेत्रीं ।।४७।। तरी ते शुक्लगतीनें जाती । ब्रह्मभूतत्व पावती । यात्रा तेथ भक्त करिती । भाद्रपद शुक्ल चतुर्थीसी ।।४८।। महोत्सव परायण सेविती । क्षेत्रवासी जन प्रीतीं । देवर्षि गणांसह बोध करिती । गजानन ज्ञानाचा बोधक ।।४९।। विघ्नराजाचीं चरित्रे सांगतीं । आनंदाश्रु नयनीं दाटती । विघ्नेश्वराची स्तुति करिती । ऐशापरी ते बहुविध ।।५०।। कोणत्याही अन्य दिनीं

करिती । यात्रा जरी भावभक्ती । ते मानव या लोकीं भोगिती । अनंत भोग निश्चयें ।।५१।। अन्तीं मुक्तिलाभ तयांप्रती । विघ्नराजास जे नमिती । मनेप्सित सारें लाभती । सुखयुक्त त्या योगें ।।५२।। विघ्नेश्वराचे भक्त जगांत । कोठेही वसती ब्रह्मभूत । त्यांचें दर्शन पावक होत । अन्य जनांसी नि:संदेह ।।५३।। ऐसें हें सर्व खंडांत । द्विपात क्षेत्र उत्तम असत । उत्तर दिशेस ललामभूत । विघ्नेशांनी जें वसविलें ।।५४।। ब्रह्मभूयप्रद क्षेत्र अद्भुत । विघ्नेश क्षेत्र चतुष्पदयुक्त । त्याचें वर्णन करण्या असमर्थ । वेदही असती विस्मित ते ।।५५।। परी संक्षेपें सांगितलें । क्षेत्रमाहात्म्य तुजला भलें । विस्तारें सांगण्या बळ कोठलें। कोणासही या जगीं ।।५६।। ऐसा विघ्नेश्वर देव असत । नाना अवतार तो घेत । भक्तांच्या संरक्षणार्थ । अभक्तांच्या नाशार्थ ।।५७।। अवतार त्याचे असंख्यात । ते सारे वर्णनातीत । हें ममासुराचें शमन पुनीत । चरित्रीं या वर्णिलें ।।५८।। तें सर्व सिद्धिप्रद सतत । वाचका पाठकास होत । ममात्मिक भय मुक्त । लाभे ब्रह्म सनातन तो ।।५९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते ममासुरशांतियुक्तविघ्नेशचरितक्षेत्रवर्णनं नाम नवमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय नववा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । दिती म्हणे कश्यपाप्रत । ऐकलें विघ्नराजाचें चरित । पूर्ण सिद्धिप्रद समस्त । परी तृप्त न झालें मुनीश्वर ।।१।। अहो विघ्नपति साक्षात । ब्रह्मभूत नि:संशय असत । तुझ्या वचनानुसार ज्ञात । विशेषें सांप्रत मजलागीं ।।२।। विघ्नेशाचे अवतार मजप्रत । मुख्य जे ते सांगून पुनीत । तारी या भवार्णवांत । महायोगी हें

ऐकून ।।३।। कश्यप हर्षभरित तैं आलिंगित । प्रियेसी तदनंतर म्हणत । वचन जें हितयुक्त । तें मुद्गल सांगती दक्षासी ।।४।। धन्य धन्य तूं दक्षपुत्रि भक्तियुक्त । ऐक विघ्नेश्वर चरित । तुझ्या मनीं रति संभवत । सार्थक होईल तव जीवाचें ।।५।। विघ्नेशानें जग समस्त। महादेवि असन्मय सृजिलें अद्भुत । सद्रुप तें मायाद्वयांत । बिंबित करून प्रभु राही ।।६।। त्याचें करून मिलन । द्विविध करून सर्जन । स्वतः परत उत्थान । नंतर सोऽहं बिंदुक ।।७।। चतुर्विध जगत त्यापासून । सृजिलें विशेषयुक्त पावन । स्थूल सूक्ष्म समात्माख्य शोभन । एक अनेकादि संयुत ।।८।। ऐसें नानाविध ब्रह्म पावन । नानाविध विश्वही असून । आनंदानें परी विहीन । व्यापारवर्जित जाहलें ।।९।। आपापलीं कार्यें न करिती । मोहयुक्त सर्व असती । तीं सर्व तत्त्वें खेदयुक्त होतीं । तप घोर करिती तदा ।।१०।। एकाक्षरविधानें ध्यान करिती । विघ्नेश्वरातें पूजिती । ऐसीं दिव्य वर्ष सहस्त्रें जातीं । तपश्चर्या अविरत चाले ।।११।। तेव्हां विघ्ननायक प्रसन्न । होऊन प्रकटें हृदयीं पावन । नरकुंजरयुक्त रूपाचें दर्शन । तेव्हां घडवी ब्रह्मांसी ।।१२।। प्रमुदित तीं ब्रह्में नमिती । विघ्नेशकृपेस पात्र होतीं । त्याच्या रूपज्ञानें लाभती । बोध अमल तेणें तुष्ट ।।१३।। नंतर विष्णुरूपें वरद होत । विघ्नेंश प्रकटून त्यांस म्हणत । वर मागा जो इच्छित । पुरवीन मीं निश्चयेंसी ।।१४।। ब्रह्में त्यास पाहून विस्मित । गणेशज्ञान त्यास होत । बिंबात्मक प्रतापवंत । सर्वत्र हा विघ्नेश असे ।।१५।। गजवक्त्रादि चिन्हयुक्त । स्वमहिम्यांत हा स्थित । हर्षयुक्त बह्में भक्तियुक्त । नमून पूजिती महाविष्णुसी ।।१६।। ब्रह्में विष्णुरूप गणेशास स्तविती । मनोभावें स्तुती करिती । विघ्नेशासी गरुडध्वजासी । चतुर्भुजासी नमन असो ।।१७।। सर्वांच्या पतीसी चक्रपाणीसी । रमेशासी परात्परासी ।

हेरंबासी वैकुंठनाथासी । स्वानंदवासीसी नमन असो ।।१८।। गजाननासी ढुंढीसी । अपारासी महेशानसुतासी । काश्यपासी शेषपुत्रासी। भक्तवत्सला नमन असो ।।१९।। दैत्य दानव नाशकासी। शार्ङ्गधरासी गदाधरासी । देव देवासी वासुदेवासी । धर्मस्थापकासी नमन असो ।।२०।। सदसन्मय रूपासी । आनंदादिधारकासी । समासी सर्व भावांत शाश्वतासी । वाक-अतीतरुपासी नमन असो ।।२१।। देहदेहि प्रचारकासी । बोधासी विदेहासी । विष्णूसी परेशानासी । नमन असो पुनः पुन्हा ।।२२।। जेथ वेद झाले कुंठित । योगिजन मौन धरित । त्या तुज काय स्तवूं सांप्रत । महाभागा प्रसन्न हो ।।२३।। ऐसें स्तवन करून । जनार्दनासी केलें वंदन । त्यांस उठवून म्हणे वचन । विष्णु तेव्हां हर्षानें ।।२४।। तुम्हीं रचिलेलें स्तोत्र पावन । भुक्तिमुक्तिप्रद शोभन । मुक्तिप्रद पाठका वाचका प्रसन्न । ब्रह्मदायक सर्वदा ।।२५।। ब्रह्मांनो जें जें इच्छित । असेल तें मागा सांप्रत । देईन मीं तपतुष्ट । स्तोत्र प्रिय हें मजला ।।२६।। ब्रह्में प्रार्थिती नाथा आम्हांप्रत । देई आनंदमय आणिक पुनीत । सौख्य जें स्वाभाविक श्रेष्ठ । सामर्थ्य आमुच्या कार्यांत ।।२७।। सत्यसंकल्प संभव बळ देऊन । दृढ भक्ति तव पदीं निर्मून । योगशांतिभव पावन । ब्रह्मभूयप्रद सौख्य देई ।।२८।। विष्णु म्हणे देईन प्रार्थित । ब्रह्मांनो सारें तुम्हांप्रत । सफळ कार्य करा सतत । आपापलें अति उत्तम ।।२९।। ब्रह्मप्रद योग शांतिवर्णन । करीन तें करा श्रवण । भक्तियुक्त योगसेवनें शोभन । ब्रह्मांनो तुम्हीं सांप्रत ।।३०।। पंचचित्तमयी बुद्धि असत । भ्रांतिधारी परम जगांत । सिद्धि जाणा सर्वत्र सतत । त्यांचा स्वामी गजानन ।।३१।। संप्रज्ञात्मक देह वर्तत । असंप्रज्ञात्मक शिरयुक्त । गजरूप त्यांच्या योगें घेत । देहधारी गजानन ।।३२।। संयोगाख्य गकार । योगग तो णकार ।

त्यांच्या योगें गजवक्त्र । नामें ख्यात जाहला ।।३३।। स्वसंवेद्य योगें होत । त्या गणेशाचें दर्शन पुनीत । त्यायोगें हा स्वानंदवासी स्मृत । रहस्य आणखी सांगतों ।।३४।। असत् रूप शक्ति ज्ञात । सद्रूप भानु ख्यात । मीं विष्णु समरूप जगांत । नेति भावें शंकर असे ।।३५।। या चार ब्रह्मांच्या संयोगें ख्यात । स्वानंद नामें बुध जाणत । स्वानंद मायेनें युक्त । ब्रह्मांच्या संयोगें होई ।।३६।। अयोग ब्रह्माचें मायाविहीनत्व । संयोग अयोग मिश्रत्व । शांतिरूपधर गणेश तत्त्व । त्यास भजा विशेषानें ।।३७।। हृदयांत चित्तप्रचालक । तेणें ब्रह्मभूतत्व पावक । पावाल ब्रह्मांनो निःशंक । भक्तिकारणें हा योग कथिला ।।३८।। जें जें जगताच्या रचनादिक । तत्त्वें करती क्रियात्मक । तें गणेशास समर्पून साधक । करा आपुल्या सर्व क्रिया ।।३९।। ऐसें बोलून महाविष्णु होत । अन्तर्धान क्षणांत । ब्रह्में त्यास नमस्कार करित । स्वस्वकार्यीं रत झाली ।।४०।। क्रमशः ब्रह्मभूत होत । ती ब्रह्में गणेशयोगे युक्त । हे दक्षनंदिनी आनंद युक्त । क्रीडती सर्व चराचरांत ती ।।४१।। परस्परांसी क्रीडा करिती । जगासी आनंद देती । ऐसें हें वर्णिलें तुजप्रती । विष्णुरूप विघ्नराजाचें चरित ।।४२।। देवि दिति, हें परम शोभन । वाचील वा ऐकेल एकमन । तो नर स्वानंद लाभून । भुक्तिमुक्ति सर्वही लाभेल ।।४३।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते विष्णववतार वर्णनं नाम दशमोऽध्यायः समाप्तः श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय दहांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । कश्यप कथा पुढे सांगत । एकदा नारायण सुखांत । आसनीं होते विराजत । विष्वक्सेन तैं तेथ आला ।।१।।

नारायणासी वंदून । प्रार्थना करी तो विनतमन । केशवा शांतिप्रद योग पावन । सांगा मज कृपाळा ।।२।। तो योग मीं साध्य करीन । भक्तीनें विष्णुरूप होईन । श्रीनारायण बोले वचन । नामरूपात्मक सर्व असत्य ।।३।। ऐसें वेदशास्त्रें सांगती । जन्म मृत्यु तयापाशीं । नामरूपात्मक ब्रह्म निश्चिती । तैसेंच जाण विष्वक्सेना ।।४।। जें सर्व भेदविहीन । तें परब्रह्म श्रेष्ठ पावन । तें अमृत सत्य एक जाण । योगसेवेने तें जाणावें ।।५।। त्यांच्या योगे सम ब्रह्म । सदानंदमय अभिराम । विष्णुरूप ते शोभन । जाणावें भक्तिभावानें ।।६।। तेंच विघ्नराजाख्य ज्ञात । वेदांत ब्रह्म प्रतिष्ठित । त्यास विधानपूर्वक भजत । तरी तुज शांति लाभेल ।।७।। विष्वक्सेन विचारित । विघ्नेश्वर विष्णुरूपें कैसा प्रथित । सर्वशास्त्रज्ञा सांग मजप्रत । संशय सारा दूर व्हावा ।।८।। श्रीविष्णु सांगती तयाप्रत । माया सुख तें विघ्नयुक्त । आत्मसौख्य तें विघ्नरहित । बुध जन ऐसें सांगती ।।९।। त्यांच्या योगे गणेश ख्यात । विघ्नराज नामें जगात । सदानंदमय त्यास सेवित । योगिजन सदा श्रद्धेनें ।।१०।। गण समूहरूप असत । समूह बह्मवाचक वर्तत । बाह्यांतरादि योगें ज्ञात । योगिजनांस हे ध्रुव ।।११।। गणेशाचें बिंब मायायुक्त । पडलें ते शिवविष्णु आदि ख्यात । म्हणून आम्ही सारे कलांशभूत । त्या गजानन प्रभूचे ।।१२।। त्यास विधानें तू भजशील । तरीच शांति लाभेल । कश्यप म्हणे विष्वक्सेन निर्मळ । विचारी पुनः वंदूनिया ।।१३।। भक्तिसंयुक्त विष्वक्सेन म्हणत । मी न भजे विघ्नेशा सांप्रत । तुझ्या भक्तींत परायण असत । तुजहून श्रेष्ठ न जाणे मी ।।१४।। ऐसें सांगून प्रणाम करित । विष्णूस नंतर जात वनांत । योगसिद्ध्यर्थ तप करित । आदरभावें विष्वक्सेन ।।१५।। विष्णूस हदयांत ध्यात । सर्वभावांत आनंद अनुभवित । मंत्रराज विष्णूचा जपत । इदं विष्णुस्तु ऋग्वेदांतला ।।१६।।

निराहार राहत प्रतापवंत । वैष्णव शिरोमणि तप आचरित । ऐसीं शंभर वर्षें पूर्ण होत। तैं प्रसन्न गणनायक झाला ।।१७।। त्यास समाख्य योग देत । भावधर प्रभू कृपावंत । स्वयं संयोगरूप पाहून हर्षित । जाहला विष्वक्सेन तेधवा ।।१८।। तदनंतर हृदयांत पाहत । गणेशास लक्ष्मी सहित । परी विष्णूस आठवून होत । खेदाकुल तो महायश ।।१९।। मंत्र जपे विष्णुपर । परी गणेशास पाही सत्वर । क्षणांत नारायण लक्ष्मीवर । पाहतसे हृदयांत ।।२०।। क्षणांत विघ्नेश्वरासी पाहत । म्हणोनि तो होत विस्मित । तपाच्या अतिप्रभावें शुद्धचित्त । जाहला तैं विष्वक्सेन ।।२१।। अभिमानज मोह त्यागून । विचार करी हृदयीं एकमन । मायामय शरीर असून । मायाहीन मस्तक असे ।।२२।। गजाकार त्यांच्या योगें होत ।देहधारी गणेश्वर जगांत । याचें बिंब सदा मोहयुक्त । हें असे विनिश्चित ।।२३।। विष्णु समभावस्थ लक्ष्मीयुक्त । देव सिद्धिबुद्धि समन्वित । आपल्या महिम्यांत संस्थित । मायाखेळ करतो हा ।।२४।। तोच लक्ष्मीपति ख्यात । विष्णूने बोध केला असत । पूर्वी अभिमानकारणें न मनांत । तेव्हां तो ठसला होता ।।२५।। अबुद्ध नसे तद्रूप । वृथा पांडित्याचें रूप । योगासम स्वरूप । न ऐकलें वा पाहिलें ।।२६।। ज्याच्या सेवनमात्रें होत । अभिमान नष्ट त्वरित । ऐसा विचार करून ध्यात । देवेशा त्या गणेशासी ।।२७।। ध्याऊन पूजी भावयुत । मानस पूजा विधीनें तो भक्त । तेव्हां भक्तवत्सल गणेश होत । प्रसन्न त्याच्या भक्तीनें ।।२८।। विष्वक्सेनाच्या आश्रमांत । प्रिये दिति तो जात । वर देण्यास तयाप्रत । परी तो भक्त ध्यानमग्न ।।२९।। गजानन समोर स्थित । परी त्यास त्याचें भान नसत । एक आश्चर्य दाखवित । विघ्ननायक त्या वेळीं ।।३०।। हृदयांतील गणेशास करी लुप्त । परी तो अन्य क्षणीं बाहेर दिसत । लक्ष्मीयुक्त गणाधीशास पाहत।

जाहला हर्षभरित तेव्हां ।।३१।। उठून त्यास प्रणाम करित । विष्वक्सेन त्यास पूजित । पुनरपि घाली दंडवत । आनंदाश्रू नयनांत ।।३२।। भक्तियुक्त स्तुति करित । गजाननासी हात जोडित । विघ्नेशा तुज मी नमित । भक्तविघ्नविनाशका ।।३३।। अभक्ता विघ्नदात्यासी । भक्तांच्या सुनाथासी । लक्ष्मीपतीसी सिद्धिबुद्धिपतीसी । स्वानंदवासीसी तुज नमन असो ।।३४।। विकुंठस्थासी केशवासी । परेशासी चक्रपाणीसी । गदाधरासी हेरंबासी । परशुधारका नमन तुला ।।३५।। दशरथसुतासी वासुदेवासी । शिवपुत्रासी देवेशासी । वरेण्यसुनूसी योगाकारासी । योग्यांच्या नाथा नमन तुला ।।३६।। योग्यांस शांतिदात्यासी । कर्त्यासी हर्त्यासी सदा सुपात्रासी । गणेशासी नाभिशेषासी । शेषशायीसी नमन तुला ।।३७।। सर्पयज्ञोपवीतीसी । लंबोदरासी शाश्वतासी । नाना खेळ कर्त्यासी । नाना मायाचालका नमन तुला ।।३८।। खेळ हीनासी देव सहायकासी । असुरांच्या विनाशकासी । आसुरांसी वरदात्यासी । ढुंढिराजा तुला नमन असो ।।३९।। भक्तिप्रियासी भक्तेशासी । गणेशासी गणपालकासी । परात्परासी नारायणासी । कृष्णा मेघश्यामा नमन तुला ।।४०।। माया प्रभावें विष्णुरूपासी । सदा स्वमहिम्यांत स्थितासी । गणेशासी विष्णुनामें ख्यातासी । गणेशा तुज नमन असो ।।४१।। जो विष्णु तोच विघ्नेश ज्ञात । अंतर त्यांत काहीं नसत । ऐसी स्तुति करून नमत । महामति तो विष्वक्सेन ।।४२।। त्यावरी होऊन प्रसन्न । श्रीविघ्नेश बोले वचन । माग आतां वरदान । देईन तें मीं भक्तितुष्ट ।।४३।। तुझ्या स्तोत्रानें मी तुष्ट । भुक्तिमुक्तिप्रद हें इष्ट । पाठका वाचका संतुष्ट । करील सर्व सिद्धि देऊनिया ।।४४।। कश्यप म्हणे दितीसी । गणेशवचन ऐकून तयासी । कर जोडून करी वंदनासी । विष्वक्सेन मान वाकवी ।।४५।।

भक्तिपूर्वक म्हणे देवा प्रसन्न । जरी तूं गजानन । तरी तुझ्या पदपद्मीं माझें मन । दृढ राहो सर्वदा ।।४६।। तुझ्या भक्तींत सदा रमावें । शांतियोगास योग्य व्हावें । ऐसें देवा मज द्यावें । वरदान मजला इच्छित ।।४७।। गणराज तें ऐकून म्हणत । तुझें ईप्सित पूर्ण होत । माझी दृढ भक्ति तुझ्या हृदयांत । नांदेल यांत संशय नसे ।।४८।। विष्णु संगतीनें प्राप्त । होईल शांतियोग तुज पुनीत । जें जें इच्छिसी तें तें होत । सफल हा वर देतसें ।।४९।। ऐसें देऊन वरदान । अन्तर्धान पावला गजानन। भक्तिनियंत्रित तो देव महान । विष्वक्सेन गेला वैकुंठीं ।।५०।। तेथ विष्णूस भेटत । त्यास सांगे सर्व वृत्तान्त । तो ऐकतां संहर्षित । केशव तेव्हां जाहला ।।५१।। त्यास महायोग निवेदित । त्याची साधना करितां होत । यथाविधि श्रद्धा युक्त । विष्वक्सेन योगिवंद्य ।।५२।। गणेशास भजे भक्तिसंयुत । महाविष्णूस गुरुरूप मानित । गणेश्वरास देवत्वें स्वीकारित । हृदयांत ध्यान करी त्याचें ।।५३।। ऐशा ध्यानें महातेजयुक्त। योगांत होत पारंगत । ऐसें हें लक्ष्मीगणेश चरित । सांगितलें तुज सर्वार्थद ।।५४।। याचें करितां वाचन । अथवा श्रद्धायुक्त श्रवण । सर्वसिद्धि लाभून । आनंदपद लाभेल ।।५५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खण्डे विघ्नराजचरिते लक्ष्मीविनायकचरितवर्णनं नामैकादशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय अकरांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । कश्यप कथा पुढची सांगत । मधुकैटभ दैत्य उन्मत्त । जाहले तेव्हां तप आचरित । विष्णु श्रद्धायुक्त मनानें ।।१।। गणेशास तो आराधित । योगसेवेचें व्रत घेत । तेव्हां विघ्नेश प्रसन्न होत।

वर देई जनार्दनासी ।।२।। त्यायोगें नंतर करी हनन । त्या दोन असुरांचें जनार्दन । मधुकैटभ असुर परम दारुण । भय त्याचें नष्ट झालें।।३।। गणेशवरदानानें बलवंत । जनार्दन ऐसा यशोयुक्त । दिते तुझा सुत त्यास जिंकीत । हें कैसें शक्य होय ।।४।। म्हणून स्वपुत्राची ममता । त्यागून धरी समता । विघ्नेशासी भावें भजतां । वंदनीय तूं होशील ।।५।। जैसें गणराजानें रचिलें । देव असुर मानव-युक्त भलें। तैसेंच त्रिविध जग शोभलें । अद्यापिही हें समस्त ।।६।। कश्यपाचें ऐकून वचन । हर्षयुक्त दिती बोले प्रसन्न । सुखप्राप्त्यर्थ उपाय शोभन। योगिवंद्या सांगा मजला ।।७।। दिति म्हणे विघ्नराज चरित । पुनरपि सांगा मजप्रत । मुनिमुख्य तुम्हीं ज्ञानवंत । गणेशतत्त्व कोविद ।।८।। कश्यप तेव्हां तिजला सांगत। धर्मघ्नाचा होता सुत । यज्ञध्रुक् नाम असुर विख्यात । तो शैवी उपासना करी ।।९।। पापनिश्चय तो करित । अति उग्र तप एकचित्त । पंचाक्षरविधानें तोषवित। शंकरासी बहुकाळ ।।१०।। दिव्य वर्ष सहस्रें तप करित । शंकर तेव्हां संतुष्ट होत । वर देण्या तो प्रकटत । यज्ञध्रुक् त्याची पूजा करी ।।११।। शंकर प्रसन्नचित्त त्यास सांगत । वर माग जो मनेंप्सित । तो मीं देईन तपतुष्ट । असुरा धन्य तूं भक्त माझा ।।१२।। तेव्हां तो असुर प्रार्थित। जें जें असेल त्रिगुणें युक्त । त्यापासून मरण मजला जगांत । कधींही कुठेंही न यावें ।।१३।। राज्य ब्रह्मांडाचें देई । आरोग्य सुख मजसी देहीं । नित्य द्यावें ज्याची इच्छा होई । ते तें सफळ होवो देवा ।।१४।। शंकर तथाऽस्तु म्हणून । त्वरित पावले अन्तर्धान । तदनंतर स्वगृहीं परतून। दैत्यराज सुखावला ।।१५।। तदनंतर सैन्य जमविलें । त्यानें विजयार्थ प्रयाण केलें । शंभुमुख्य देव पळाले । दशदिशांत त्या वेळीं ।।१६।। भयभीत ते स्वलोक सोडित। तेथ तो दैत्यश्रेष्ठांस स्थापित ।

यज्ञविनाशार्थ झटत । सर्वयत्नें यज्ञध्रुक् दैत्य ।।१७।। यज्ञविध्वंसन करित । मुनींस ताडन करी क्रूरचित्त । तेव्हां यज्ञ सोडून पळत । भयभीत मुनिजन सारे ।।१८।। वर्णसंकर सर्वत्र माजला । चराचरांत भ्रष्टाचार झाला । तेव्हां विष्णूच्या नाशार्थ त्या वेळां । महाखल तो यत्न करी ।।१९।। देवांचें मूळ करण्या नष्ट । दैत्य झटती घेऊन कष्ट । यज्ञ हाच विष्णु हें सांगत । वेदांत वेदवादी सदा ।।२०।। यज्ञाचा नाश केला । तर विष्णु कोठें उरला । ऐसा विचार करुन त्या वेळा । यज्ञभंजना असुर जाती ।।२१।। त्रैलोक्य केलें यज्ञहीन । त्यायोगें विष्णु क्षुधापिडित होऊन। अस्थिचर्म अवशेष दु:खमग्न । सर्व देवांसहित तेव्हां ।।२२।। गणनायकासी भावें स्मरत । म्हणे रक्षण करी तूं त्वरित । गणनाथा तूं कृपावंत । परम दारुण दैत्य झाले ।।२३।। जरी न करशील रक्षण। अटळ असे आमुचें मरण । यज्ञनाश सर्वत्र होऊन । स्वाहाकार नष्ट झाला ।।२४।। ऐसा मनीं विचार करिती । सर्व देव तप करिती । एकाक्षर विधानें तोषविती। विघ्नपासी भक्तीनें ।।२५।। शंभर वर्षें ऐसीं जात । तप झालें श्रद्धायुक्त । गणनायक तुष्ट होत । वरद प्रसन्न विघ्नेश्वर ।।२६।। देवांनी मागितला वर । माजला यज्ञधृक् असुर । त्याचा नाश करा सपरिवार । वरदान तें देवें दिलें ।।२७।। तदनंतर देवगणांसहित। यज्ञ संहर्त्यास मारण्या उद्युक्त । अत्यंत क्रोधयुक्त चित्त । तत्क्षणीं गेला विघ्नेश्वर ।।२८।। महाघोर युद्ध करुन । अंकुशाचा आघात भीषण । त्यायोगें यज्ञधृक् असुरास मारुन । मुक्तिनिर्वाण त्यास दिलें ।।२९।। अन्य दैत्य पाताळांत । पळून गेले भययुक्त । तदनंतर मुनिगणांसमवेत। विष्णु स्तवी गणेशासी ।।३०।। विघ्नराजासी विघ्नकर्त्यासी । महाविघ्नप्रशांतासी । देवदेवेशासी अनादीसी। परेशासी नमन असो ।।३१।। सर्वप्रथम संस्तुतासी । सर्वांस वरदात्यासी । वरदासी

विनायकासी । सर्वांच्या नायकासी नमन ।।३२।। ढुंढिराजासी वेदादि ढुंढितासी । सर्वांस स्वरुपे सुखदात्यासी । परात्म्यासी आनंदासी । अप्रमेया ब्रह्मा तुज नमन ।।३३।। गणांच्या पतीसी स्वानंदनाथासी । नाना गण सुरूपासी । सिद्धिबुद्धिपतीसी मुनीसी । ब्रह्मा विष्णु शिवरुपा नमन ।।३४।। इंद्रादि देव कलांशासी । असंसी क्षत्ररुपा वंदितो तुजसी। क्षत्रवैश्यशूद्ररुपासी । पशुपक्ष्यादिरूपा नमन तुला ।।३५।। वर्णाश्रम योजकासी । नागासी सुररूपासी । राक्षसासी विहारीसी । चराचरमया नमन तुला ।।३६।। शूर्पकर्णासी त्रिनेत्रासी । त्रिशुलधारकासी चक्रधरासी । पाशांकुशधर्त्यासी । हेरंबासी नमन असो ।।३७।। परेशासी सर्वात्मकासी । सदैव बोधरुपासी । निरंजनासी अयोगासी । संयोगमया तुज नमन ।।३८।। जनांस शांतिप्रदात्यासी । सर्व जगाच्या शरणधामासी । किती स्तवू गणधीशा तुजसी । वेदही तेथ मौन धरित ।।३९।। योगिजन होती विस्मित । तुझ्या वर्णनीं ते शांतिस्थ । शांतिरूपा तुज वंदित । संरक्षिलें तूं आज आम्हां ।।४०।। स्वामी देवर्षी आम्ही समस्त । सर्वभावें तुज नमित । प्राणदाता तूं आम्हांप्रत । भक्ति दे तुझ्या पदांबुजाची ।।४१।। गणाधीश तैसी दे अमल भक्ति । होऊ योगेशा बंधहीन जगतीं । ऐसें बोलून पुनरपि वंदिती । देव तैसे मुनिजन सारे ।।४२।। त्यांची प्रार्थना मान्य करुन । शूर्पकर्ण पावला अन्तर्धान । त्याची मूर्ति तेथ स्थापून । पूजिती भक्तिभावें सर्वदा ।।४३।। तदनंतर संतोषयुक्त । ते जाती स्वस्थानाप्रत मुदित । आपापले आचारकर्म करित। चराचर सुव्यवस्थित झाले ।।४४।। ऐशापरी विघ्नेशें हनन । केलें दैत्यांचें भीषण । असंख्य अवतार घेऊन । वर्णन त्यांचे शब्दातीत ।।४५।। संक्षेपानें मी कथिले । यथामति मी कांही त्यांतलें । भजन करी त्याचे सदैव भले । तेव्हां शांतिलाभ तुला ।।४६।। ज्यापरी धूलियुक्त

धान्य पाखडित । मानव तें सुपात । तदनंतर भोजनादिकांत उपयुक्त । उत्तम धान्य तें होतसे ।।४७।। तैसी त्या शूर्पकर्णाची उपासना । अत्यंत आवश्यक जनां । मायाविकारें युक्तांना । ब्रह्म नाहीं लाभणार ।।४८।। शूर्पकर्णाचें गुण करिता श्रवण । हृदयस्थ मल त्यागून । नरास ब्रह्मलाभ महान । म्हणून शूर्पकर्ण नाम ख्यात ।।४९।। सुपासम हृदय शुद्ध करित । मायेचा भुसा बाहेर टाकित । ऐसा हा ब्रह्मप्रद देव विख्यात । वेदांत असे वर्णिला ।।५०।। त्याचें भजन करी विधानानुसार । तरी दिति तूं शांतियुक्त थोर । होशील यांत न संशय तिळमात्र । विघ्नेश्वर पूजन सर्वार्थप्रद ।।५१।। शूर्पकर्णाचें हें चरित । ऐकतां वा वाचतां लाभत । मानसेप्सित सारें सर्वदा ।।५२।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते शूर्पकर्णावतारवर्णनं नाम द्वादशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु।

(अध्याय बारांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । कश्यप सांगे दितीस । एकदा होता माघमास । सूर्य असतां मकरराशीस । देवविप्र तीर्थें प्रयागास जाती ।।१।। सर्व होते प्रमुदितचित्त । माघस्नानासाठीं उत्कंठित । स्नान करुन ते पूजित । ॐकारगणनाथासी भक्तीनें ।।२।। तदनंतर शूलधरास पूजून । तत्रस्थं माधवासी आराधून । त्रिवेणीस वंदून । पुरातन गोष्टी सांगत होते ।।३।। तेथ संचार करित । योगींद्रसत्तम दत्त येत । जो अवधूत मार्ग प्रसिद्धीप्रत । नेण्यांत होता अग्रेसर ।।४।। गाणेशं ब्रह्मपं ब्रह्म परं । सर्वार्थदायक ओंकार गणनाथास । प्रणाम करुन स्तुतिस्तोत्रास । गाइले त्यानें

आदरानें ।।५।। तें पाहून परमाश्चर्ययुक्त । शिवादियोगी त्यास नमित । कश्यपादी योगी देवही वंदित । आदरानें तयासी ।।६।। त्यास प्रणाम करुन । गणेशभजनांत मग्न पाहून । ते योगींद्रास विस्मितमन । नंतर विचारिती आदरानें ।।७।। शिवादि त्या योगींद्रास म्हणत । भगवंता आपण ब्रह्मपारंगत । सर्वतत्त्वज्ञ ब्रह्मशरीर साक्षात । यदृच्छेनें भेटलात ।।८।। अवधूत मार्ग प्रकाशनार्थ । देहधारी झालात । शरीरधारणा करण्या पुनीत । दर्शनमात्रें कृतकृत्य आम्हीं ।।९।। आतां स्वामी बोध करावा । आम्हां देवांस मुनीस दाखवा । आमुचे भवार्णवीं तारक व्हा । विनयें प्रार्थना ऐसी केली ।।१०।। तेव्हां तो त्या महाभागांप्रत । हर्षभरें महामुनि सांगत । ब्रह्माविष्णु शिवांनो सांप्रत । तैसेंचि अन्य देवांनो ।।११।। मुनींनो शेषादि नागराजहो ऐकावें । वचन माझें भक्तिभावें । ब्रह्म हेच एक सत्य मानावें । त्यास भजावें हितास्तव ।।१२।। ऐसें करतां ब्रह्मभूत । तुम्ही व्हाल समर्थ निश्चित । त्याचें तें वचन ऐकून म्हणत । वंदन करुन तयासी ।।१३।। शिवादि त्या योगिवंद्यास । विचारिती एका प्रश्नास । ब्रह्मांत आपण ब्रह्मभूत विशेष । गणेशास कां भजता तरी ।।१४।। हा गणेश नामरूपधर । ओंकाराकृतिधर थोर । आमुचा कुलदेव त्रिगुणात्म शरीर । यांत नसे संशय ।।१५।। परी तो योग्यांसी मूलभूत । कैसा असे तें न ज्ञात । त्यांचें वचन ऐकून बोलत । स्मित करुन दत्तात्रेय ।।१६।। महायश तो हर्षभरित । ज्ञानदानार्थ उत्कंठित । दत्त म्हणे त्या समस्तांप्रत । गणेश ब्रह्मांचा नाथ असे ।।१७।। ऐसे वेदांत प्रख्यात । ब्रह्म नानाविध वर्तत । ते मायेनें युक्त असत । अन्न हें ब्रह्म जाणावें ।।१८।। देवेशांनो मुनींनो ऐकावें । अन्नमय रूपा मायेसी जाणावें । मोहकरी मायेसी स्वभावें । हा पहिला उपदेश असे ।।१९।। प्राण ब्रह्म असून । तेथ प्राणाकार विमोहिनी मनमोहन । मनब्रह्मांत मनोमय

होऊन । माया सर्वदा रहातसे ।।२०।। विज्ञान ब्रह्म असत । तेथ विज्ञानरूपें विलसत । आनंद ब्रह्म जै असत । तैं माया आनंदरूप ।।२१।। चैतन्य ब्रह्म वर्तत । ते माया चैतन्यरूप ख्यात । बिंदु ब्रह्म जें असत । तेथ माया बिंदुमयी ।।२२।। सोऽहं ब्रह्मांत सतत । माया सोऽहं प्रकाशिनी ज्ञात । बोध ब्रह्म जेव्हां असत । बोधाख्या माया तेथ विमोहिनी ।।२३।। विदेह ब्रह्म जें उक्त । देहरूप माया तेथ । महादेव त्या मायेनें युक्त । ब्रह्ममानी भ्रमण करिती ।।२४।। कर्म ब्रह्म जेथ ज्ञात । तेथ माया कर्माख्या मोहवित । ज्ञान ब्रह्म असतां ज्ञान मायायुत । माया असे प्रख्यात ।।२५।। सम ब्रह्म जरी ज्ञात। माया समरुपिणी तेथ ।सहज ब्रह्म असता होत । माया सहजाख्याविकारप्रदा ।।२६।। असद् ब्रह्म जरी ज्ञात । तें असन्मायायुक्त । सद् ब्रह्म जें असत । ते सदाकार मायायुत ।।२७।। असद् ब्रह्म असन्मायायुक्त । सद् ब्रह्म सदाकारमायायुक्त । सद्सन्मय भावाख्य असत । ब्रह्म उभयात्मविकारयुत ।।२८।। अव्यक्त ब्रह्म जें असत । तें अव्यक्त मायायुक्त । स्वसंवेद्य पर ब्रह्म वर्तत । स्वानंद मायायुक्त सदा ।।२९।। आत्माद्वयैक सर्वाख्य असत । आद्य शब्द परिकीर्तित । महावाक्यादींनी ते होत । त्या त्या मायेचे प्रकाशक ।।३०।। शिवविष्णुमुख शब्द ख्यात । ब्रह्मवाच्य हेही सतत । त्या त्या विकारें संयुक्त । देवसत्तमांनो ते जाणावें ।।३१।। पृथ्वी जलादी तत्त्वें असती । ब्रह्माची वाचक तींही जगतीं । त्या त्या विकारयुक्त तीं । देवासमही जाणावीं ।।३२।। ऐसीं नानाविध ब्रह्मे युक्त । वेदांदींत तीं समस्त । मायामोहें असतीं युक्त । त्यांचा स्वामी ब्रह्मणस्पति ।।३३।। ब्रह्मांचा हा पालनकर्ता । म्हणून ब्रह्मपति नावें जगता । हा गणाध्यक्ष झाला तत्त्वतां । वेद सारे हें सांगती ।।३४।। तो ब्रह्मभूयमय साक्षात । द्विजोत्तमहो भजा सतत । उत्पत्ति नाश हीन

जें असत । तें गजाख्य ब्रह्म जाणा ।।३५।। सांख्य हें गणेशाचें शिर । म्हणून गजानन नाम थोर । भूमिसाधनभावें तन्मय उदार । देह नाना भूमिप्रधारक ।।३६।। म्हणोनी योगरुप ज्ञात । देहशिर योगें देहधारी उक्त । गणेशान सांख्ययोगांत। पूर्णशांतिदायक साक्षात ।।३७।। संयोगांत हा गकाराख्य असत । अयोगांत णमय ज्ञात । त्यांचा ईश गणेशनामें विलसत । वेदवादानुसार ।।३८।। पंचचित्तमयी बुद्धि वर्तत । दक्षिणांग होऊन त्याचें पुनीत । पंचभ्रांतिकरी सिद्धि भूषवित । वामांग या गणेशाचें ।।३९।। त्यांचा स्वामी गणाध्यक्ष खेळत । या दोन मायांसमवेत । त्यांच्या चित्तीं चिंतामणी साक्षात । प्रकाशदाता उभयतांसी ।।४०।। समोऽहं मीं समब्रह्म असत ।ऐशा चित्तप्रेरणा त्यागित । तेव्हा नर योगीन्द्र होत । त्या चित्त चालनकारका भजतें मन ।।४१।। सिद्धिबुद्धिद्वयांनी निर्मित । सकल ब्रह्मीं विश्वांत । त्या ब्रह्मांस सोडून लाभत । ब्रह्म कैसें मनुजांसी ।।४२।। म्हणून देहधारी होऊन। भक्तिमार्गांचें करी प्रदर्शन । सुलभतेस्तव देवेश महान । अवतार घेई वारंवार ।।४३।। त्याचें तें ऐकून वचन। वसिष्ठ विचारी संशयग्रस्तमन । ब्रह्म ब्रह्मच वेदांत वर्णन । सर्वसंमत ऐसें असे ।।४४।। तरी हा ब्रह्मणस्पति । कोण हा सांगावा जगताचा पति । महामाया पतिरूप होऊन निश्चिती । गणेशांत राहिली का? ।।४५।। जैसें अन्नब्रह्म वर्तत । जेथ माया त्या त्या विकारस्थ । तैसेंचि ब्रह्मपति ब्रह्म असत । तेथ माया पतिरुप का ।।४६।। वसिष्ठाचा ऐकून संशय । दत्त हर्षसमन्वित होय । त्यास म्हणे वचन नि:संशय । योगीन्द्र तो परमार्थज्ञ ।।४७।। अन्नप्राणादियुक्तें ब्रह्मीं होत । त्यायोगें गणेश हा पति उक्त । महायोग्या ब्रह्मीं मानित । पति तयासी आपुला ।।४८।। त्या ब्रह्मांचा नाश होत । तरी पतिभावें स्वयंब्रह्मस्थ । अन्नप्राणादि विकार त्यागित । ब्रह्मीं तेव्हां

ब्रह्मभूत ।।४९।। ब्रह्मीं ब्रह्मस्थ होती । तरी कोणाचा पति गणपति । तें सांग मज त्वरिती । मायाविकारहीन तीं ।।५०।। उपास्य भावें हा ब्रह्म परम । पतित्व याचें त्यायोगें शोभन । ऐसें त्या दत्ताचें वचन। ऐकून नारद पुन्हा विचारी ।।५१।। अवधूत तो पापरहित । भावबोधार्थ योगीन्द्रा त्या प्रार्थित । गणेशांत तदाकार तूं असत । तरी भेद कैसा उरतो! ।।५२।। मी दत्त हा एकदन्त । ऐसा भेद कोठें उरत । महाभागा जरी भिन्न नसत । तरी कोणासी तूं भजसी ।।५३।। हा संशय माझ्या चित्तांत। तूं दूर करावा सांप्रत । दत्त महाभाग तेव्हां सांगत । देह हा माझा नरतुल्य असे ।।५४।। नित्य कर्म शुभाशुभ समस्त । नामरुप विकारवश देह आचरत । ब्रह्म सर्वत्र तन्मय निश्चित । त्याची सत्ता न्यूनाधिक ।।५५।। ब्रह्मणस्पति शब्दाला सत्ता स्थित । गणपतींत एकमेव अद्‌भुत । ती नसे शुंभुविष्णु आदि देवभावांत । ऐसे जाण विचक्षणा ।।५६।। म्हणोन प्रत्यक्षत्वें चित्तांत । ब्रह्म विघ्नेशवाचक अनुभूत । त्यास पाहून भजेल जगांत । ब्रह्मभूय परब्रह्म कोण असे ।।५७।। म्हणून मीं देहधारी भजत। त्या गणेश्वरासी भक्तियुक्त । विशेषें देह क्रियात्मक परायण वर्तत । म्हणोनि यांत न आश्चर्य ।।५८।। देह क्रियात्मक असत। चित्त चिंतनकारक स्वभावें ज्ञात । ते चिंतनादिक अन्य करित । तैंसेंचि भजे गणेशासी ।।५९।। माझा देह चित्त गणेश्वरास भजत । त्याचें प्रकाशक ब्रह्म ख्यात । तें गजाननास कैसें भजत । ब्रह्म ब्रह्मचि जाहले जेव्हां ।।६०।। तदाकार माझा देह चित्त । स्वप्रकाशकरास भजत । या योगमार्गें मीं सेवित । गणनायकासी सर्वदा ।।६१।। जर मीं गणेशाहून अन्य नसत । तर कोणासी विचारसी सांप्रत । जैसें भक्षणादिक नित्य करित । आदरें मीं प्रतिदिनीं ।।६२।। तैसेंच गणेश्वरास भजत। भक्तियुक्त जरी लौकिकांत । तरी मीं देहगत जो असत । तो मी भोक्ता

नसे कदा ।।६३।। मी गणराजाचा तैं न भक्त । केवळ देहधर्म प्रवर्तत। ब्रह्मांत जो ब्रह्मभूत । तो भजे गणनायका ।।६४।। तथापि देहचित्तांत। स्वभावें अन्य आचरण करित । ब्रह्मभूत योग्यांत मुख्य न उक्त । श्रेष्ठ भक्त ऐसें ख्यात असे ।।६५।। म्हणोनि हर्षभरें मी भजत । अनायासें जें ब्रह्म चित्तांत । देहभावें विलसत । त्यास पाहून न भजे कोण? ।।६६।। ऐसें जरी न करील भजन । तरी तो जाणावा ब्रह्मघ्न । गणेशास मूर्तिगत पाहून । योगेशा शांतिदायका ।।६७।। कोणत्या योगिजनाचें मन । प्रीतियुक्त न होतें प्रसन्न । ऐसें दत्ताचें ऐकून वचन । शिवादि झाले हर्षयुक्त ।।६८।। नारदादि त्यास करिती नमन । त्याच्या क्रियांनी विनीतमन । ते सर्व त्यास म्हणती वचन । संशय आमुचा दूर केलासी ।।६९।। केलेस तूं महाभागा निश्चित । एकमार्ग परायण जगांत । नानामत विभेदांनी युक्त । भ्रांतियुक्त ते भटकती ।।७०।। जे सर्व पूज्या पूर्णा गणेश्वरास त्यागिती । ते भ्रांतिपर भटकती । त्यांच्या भ्रांतिनाशार्थ जगतीं। योगमार्ग निर्मिला विघ्नेश्वरें।।७१।। तो तूं सर्वज्ञ सर्वशांतिप्रद । आम्हां ज्ञान केलेंस विशद। ऐसें स्तविती दत्तास बोधप्रद। दत्त हसे स्तुति ऐकून ।।७२।। तदनंतर दत्त निघून जात । शिवादि देव स्वस्थानीं परतत । वसिष्ठादी मुनीही स्वगृहाप्रत । बोले तदनंतर दितिप्रिये ।।७३।। ऐसी ही दत्तात्रेय मुखातून। स्रवली जी गीता महान । सर्वसार ती पावन । पठनें श्रवणें शांतिप्रद।।७४।। सर्वसिद्धिप्रदा ती असत । कश्यपाचें वचन ऐकून युक्त। दिति त्यास प्रणाम करित । विघ्नेश्वरनिष्ठ ती त्यास म्हणे ।।७५।। भावगंभीरस्वरें विचारित । गणेश उपासनेची रीत पुनीत। कश्यप तो तिज निवेदित। पुढले अध्यायीं ही कथा ।।७६।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते दत्तगीतावर्णनं नाम

त्रयोदशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय तेरांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दिती म्हणे कश्यापासी । गणेश उपासना सांगा मजसी ।त्यापरी भजेन विघ्नेश्वरासी । निरंतर मी भक्तीनें ।।१।। मुद्गल म्हणती दक्षाप्रत । ऐसें दिती विचारित । तेव्हां कश्यप तिजला देत । दीक्षा दशाक्षर मंत्राची ।।२।। विधियुक्त विधानपूर्वक । दिती स्वीकारी तो गणेशमंत्र पावक । वृक्षसमृद्ध वनीं जाऊन चित्तैक । दृढ करी मंत्रावरी ।।३।। ऐसें तप तेथें आचरित । निराहार राहून गणेशध्यान करित । नासाग्रदृष्टि लावून जप करित । दशाक्षर गणेशमंत्राचा ।।४।। अन्य सर्व कामना सोडून । विघ्नेश्वरी रत एकमन । तयाच्या प्रभावें भ्रांतिहीन । जाहली दिती त्या वेळीं ।।५।। पुत्रपौत्रादिक भावांत । रसहीन ती होत । योगपारंगत होण्या भजत । पूर्णभावें द्विरदाननासी ।।६।। ऐसें एक सहस्र वर्षें आचरत । योगभूमिपरायणा अविरत । तप तेव्हां शांतियोग लाभत । योगिवंद्य ती जाहली तैं ।।७।। दत्तयाग मनीं स्मरत । विघ्नेश्वर पूजन कधीं न सोडित । तेव्हा प्रसन्न होऊन प्रकटत । गणनायक तिच्यापुढें ।।८।। म्हणे दिति उघडी नयन । आतां समाप्त करी ध्यान । मीं उपस्थित गजानन । वर माग मनोवांछित ।।९।। गणेशाचें ऐकून वचन । दिति हर्षभरित मन । ध्यान संपवून करी नमन । भक्तिभावें पूजी तयासी ।।१०।। पुनरपि विघ्नेशा प्रणाम करित । करांजली जोडून हर्षभरित । पूजी विघ्नेश्वरा भक्तियुक्त । स्तवन करी ती दक्षपुत्री ।।११।। विघ्नराजासी भक्तविघ्नहर्त्यासी । अभक्तां विघ्नकर्त्यासी । काश्यपासी परेशासी । विनायका तुज नमन असो ।।१२।। ढुंढिसी लंबोदरासी सर्व भोगभोक्त्यासी । दीनांच्या पतीसी हेरंबासी । दीनदीनासी

दीनपाळकासी । परेशा गणेशा नमन तुला ।।१३।। परात्परतमासी परात्परकर्त्यासी । महोदरासी अनादीसी । सर्वांच्या आदिभूतिधरासी । आदिपूज्या तुज नमन ।।१४।। सर्वांच्या अंत:स्थासी । शिवपुत्रासी विष्णुपुत्रासी । परमात्म्यासी वरेण्यसूनूसी । शेषपुत्रा तुज नमन असो ।।१५।। सर्वपूज्यासी ज्येष्ठासी । ज्येष्ठांच्या ज्येष्ठ मूर्तीसी । ज्येष्ठ राजतमासी । मातापित्या तुज नमन असो ।।१६।। ब्रह्मपतीसी ब्रह्मांसी ब्रह्मदात्यासी । ब्रह्मांच्या ब्रह्मरुपासी । एकदंतासी गजाननासी । देवासुरा समभावा तुज नमन असो ।।१७।। योगाकारासी योग्यांस योगदासी । किती स्तवूं मी तुजसी । गणाधीशा शांतींच्या शांतिरुपासी । वेदादीही जेथ हरले ।।१८।। त्यांना तैसें शिवादी देवासी । पूर्णत्वें स्तवण्या अशक्य वाटसी । अल्पबुद्धि मी तुजसी । प्रणाम करी सर्वेशा ।।१९।। विघ्नपा संतुष्ट होऊन । माझी अल्प भक्ति गोड मानून । जरी वर देण्या उद्युक्त मन । तरी माझा पुत्र होई ।।२०।। दयासिंधो हाचि वर । देऊन होई माझा तारक थोर । प्रकृति आसुरी उग्र । वेदांत उक्त द्विरदानना ।।२१।। तो मी महाभक्तीनें भजेन । निरंतर तुझें करीन पालन । जेव्हां तू माझा सुत होशील महान । तुझ्या मातेस कैसा बंध ।।२२।। मायामय बंध तोडून । तव चरणीं ढुंढे माझें मन लावुन । दृढभक्ति दे मज प्रसन्न । आसुर बंधहीन करी मला ।।२३।। तुझ्या चरण कमळासक्त । करी मज नित्य भक्तियुक्त । ऐसें बोलून गणाधीशा नमित । दक्षनंदिनी त्या समयीं ।।२४।। गणराज हर्षयुक्त । दितीस तेव्हा सांगत । तूं रचिलेलें हे स्तोत्र वाटत । अत्यंत प्रिय मजलागीं ।।२५।। वाचका श्रोत्यास सर्व सिद्धिप्रद । हें स्तोत्र होईल सुखद । तुझा पुत्र होईन मीं वरद । आसुर भाव संहारीन ।।२६।। तूं मज भजशील निरंतर । भावपरायण भक्तिधुरंधर । ऐसें बोलून अंतर्धान पावला । विघ्नेश

होत ब्रह्मनायक ।।२७।। दिति स्वगृहीं परतून । पतीस करी अभिवादन । सांगे सर्व वृत्तांत मुदितमन । तोही हर्षित ऐकतां ।।२८।। कश्यप प्रेमभरें आलिंगित । दितीस आनंदाश्रू ढाळीत । म्हणे धन्य धन्य तूं वाटत । कृतकृत्य मजसी प्रिये ।।२९।। सफल तुझा झाला जन्म। गणाध्यक्ष दर्शन मनोरम । शांतिदायकाचें होऊन । पावन तूं झालीस ।।३०।। असुरीचा तुझा सुत । होऊन गणाधीश विलसेल जगांत । योगिवंद्य महद्भाग्यें निश्चित । तारिलेंस तूं मजला गे ।।३१।। तूं माझी पत्नी शोभन । गणेश भजनीं रत होऊन । धन्य केलेंस माझे जीवन । जन्मकर्मादी सर्वही ।।३२।। आसुरी तूं स्वहितांत रत । ऐसें बोलून कश्यप स्तवित । दिति प्रणाम करुन सेवित । भक्तिभावें स्वपतीसी ।।३३।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते दितिवरप्रदानं नाम चतुर्दशोऽध्यायः समाप्तः। श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चौदांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । मुद्गल कथा पुढती सांगती । दिति गणनाथास स्मरे चितीं.। तन्मय विश्व अवलोकिती । भक्तिभावें ती सर्वदा ।।१।। एकदां माघ मासांत । शुक्लपक्षीं चतुर्थी असत । सूर्य माध्यान्हीं येतां पूजित । मूर्ति दिती गणेशाची ।।२।। त्या मूर्तीतून प्रकटत । गणाधीश चतुर्भुजांनी युक्त । अनंत सूर्यासम तेज फाकत । प्रजापते तयाचें तै ।।३।। त्यास पाहून भयभीत । कश्यपास स्मरे हृदयांत । स्वगुरूस तैसें गणेशास ध्यात । भक्तिभावें ती सती ।।४।। गुरूच्या स्मरणमात्रें धरित । सौम्यरुप गणेश त्वरीत । बालरुपधारी तो म्हणत । दितीस मेघगंभीर स्वरें ।।५।। वरदान प्रभावें तुझा सुत । झालों मी गे सांप्रत । भिऊं

नको माते पहा पुढयांत । बाळरुप तुझ्यापुढें ।।६।। दिती आपुलें नयन उघडित । तेव्हां पाही बालगणेश पुढयांत । चतुर्भुज बाळ शुंडादंडयुक्त । परशु आदि असे करी ।।७।। चंद्रशेखर लंबोदर । शेषनाभियुत एकदंत त्रिनेत्र । शूर्पकर्ण नाना भूषणधर । गळ्यांत चिंतामणि विलसे ।।८।। अमूल्य वस्त्रें देहावरी । पाहून त्यास नमन करी । कश्यपासहित ती नारी । पूजन करी प्रेमभरानें ।।९।। विघ्नेशासी अथर्वशीर्षें स्तवित । कश्यप त्यास तैं प्रार्थित । बाळरुप धरी सांप्रत । ज्यायोगें लालन पालन करी ।।१०।। धन्य मीं कृतकृत्य जगांत । मत्सम अन्य कोणी नसत। तूं माझा पुत्र अद्भुत । गणनायका ब्रह्मपते ।।११।। ज्याच्या रोमरंध्रात। कोटीं कोटि ब्रह्मांडे वसत । तो तूं माझा झालास सुत । अशक्यप्राय हें वाटतसे ।।१२।। ऐसी त्याची प्रार्थना ऐकून । दितीची ही विनंती मानून । चतुर्भुजधर बाल होऊन । तत्क्षणीं आनंदवी मातापित्यांसी ।।१३।। त्या गणाधीशा प्रणाम करुन । हर्षयुक्त स्वकर्म करुन । दितिसहित मुदितमन । बोलवी अन्य ब्राह्मणांसी ।।१४।। तदनंतर गणेश त्यांच्या हृदयांत । माया निर्मी एकदंत । तेव्हां पुत्र मानून तयाप्रत । स्नान घालून प्रेमभरें ।।१५।। दिति स्तनपान देत । कश्यप जातकर्मादि संस्कार करित । अत्यंत हर्षयुक्त । बाराव्या दिवशीं बारसें करी ।।१६।। ब्राह्मण नामकरण विधिस्तव । जमले त्यांचा हर्ष अपूर्व । कश्यप त्यांसी आदरभाव । दावून सत्कार करीतसे ।।१७।। ते म्हणती कश्यपाप्रत । हा बालक प्रभावयुक्त । स्वर्गांत देवांस स्थापील निश्चित । मनुष्यांसी पृथ्वीवरी ।।१८।। असुर नाग कूर्मादींस पाताळांत । स्थापील हा सत्तायुक्त । तत्वांचा चालक बळवंत । याचें नांव चतुर्भुज ।।१९।। विविध चार तत्वांचा स्थापक । हा थोर विभूतिमय पावक । होईल सर्वा सुखदायक । ऐसा वाटे विश्वास ।।२०।। कश्यप सुत दोन वर्षांचा

होत । तेव्हां प्रल्हादमुख्य असुर पळत । विष्णुप्रमुख देव त्यांस ताडित । पाताळांत गेले दैत्य सारे ।।२१।। देवांचें भय त्यांच्या चित्तांत । विष्णूच्या क्रोध चित्तांत । इंद्रादी देवांसहित । चक्रधारी तो प्रतापी ।।२२।। दैत्यनाशार्थ प्रवेशत । पाताळांत तो महाबलवंत । आपुलें चक्र सोडून मारित । अनेक दैत्य रणांगणीं ।।२३।। कांही असुर दु:खमग्न । गेले केशवासी शरण । कांही गेले अन्यत्र पळून । छिन्नदेह व्याकूळ मती ।।२४।। तथापि त्यांचा पाठलाग करित । तयांसी मारी क्रोधयुक्त । असुरांचा संहार समस्त । करण्या उद्यत जनार्दन ।।२५।। दैत्येंद्र भयभीत होऊन । दितीस जाती तेव्हां शरण । त्यांसी छिन्न भिन्न पाहून । दिती शोक करी मनीं ।।२६।। गणनायकही क्रोध संतप्त । आपला परशू सोडित । तीक्ष्ण तें शस्त्र धावत । देवांस मारण्या त्वेषानें ।।२७।। त्या परशूच्या तेजानें व्याप्त । पाताळ मंडळ समस्त । विष्णूचें चक्रादिक शस्त्रें होत । निष्फल व्यर्थरुप तेव्हां ।।२८।। देव दाहदग्ध होऊन । पळती दशदिशांत उन्मन । तेव्हां ब्रह्मदेव जाऊन । केशवास वृत्त सांगे ।।२९।। पाताळलोक सोडून देव समस्त । सर्व देव स्वर्गी परतत । परशूच्या तेजानें संतप्त । हाहा:रव ते करिती ।।३०।। तेव्हां शंभू सूर्य जनार्दन । ब्रह्मादि देव मिळून । त्या परशूचें करिती स्तवन । भयभीत ते मुनिगणांसह ।।३१।। त्या स्तुतीनें होत शांत । जेव्हा परशू तैं जात । देवेंद्रक सर्व चतुर्भुजाप्रत । भयोद्विग्न नमिती तैं ।।३२।। पूजन करुन हात जोडिती । चतुर्भुजासी ते स्तविती । काश्यपासी चतुर्भुजासी वंदिती । ढुंढीदेवा अनादिसी ।।३३।। गणेशासी विघ्नेशासी । परेशासी परेशपतीसी । परमात्म्यासी विनायकासी । विप्रवरदा तुला नमन ।।३४।। लंबोदरासी महोदरासी । सर्वांच्या उदरस्थासी । ज्येष्ठासी ब्राह्मणासी । क्षत्रांच्या क्षत्रधर्मासी नमन ।।३५।। वैश्यरुपासी वैश्यप्रपासी । शूद्राच्या

शुद्रधर्मासी । वर्णहीनासी गजाननासी । देवा तुजला नमन असो ।।३६।। गृहस्थांच्या गार्हस्थासी । ब्रह्मचाऱ्यांच्या ब्रह्मचर्यासी । वनस्थांच्या वानप्रस्थधर्मासी । संन्यस्तांच्या धर्मधारका नमन ।।३७।। न्यासधर्मासी आश्रमहीनासी । चारातीत पंचमासी । हेरंबासी स्वानंदवासीसी । सिद्धिबुद्धिवरा तुज नमन ।।३८।। एकदंतासी देवासी । असुरासी अनाथनाथासी । सनाथांच्या नायकासी । ईश्वरांच्या महेश्वरा तुज नमन ।।३९।। ब्रह्मासी विष्णूसी भानूसी । शक्तिप्रदासी महादेवासी । देवांसी स्वपदें दात्यासी । पुनः पुनः नमितों आम्हीं ।।४०।। किती स्तुति करावी चालका सांप्रत । चार देवांचा स्वामी बलयुत । म्हणून तुजला विनम्र वंदित । चतुर्भुजा प्रसन्न हो ।।४१।। ऐसें बोलून पुनरपि नमित । देव मुनिगणांच्या सहित । तेव्हां तो प्रसन्न होऊन म्हणत । भजनप्रिय स्वभक्तांसी ।।४२।। महादेवहो मुनिजन समस्त । वर मागा मनेप्सित । मी स्तोत्र ऐकून संतुष्ट । देईन तुम्हां निर्भय व्हा ।।४३।। तुम्हीं रचिलेलें हें स्तोत्र । सर्वसिद्धिप्रद पवित्र । पाठका श्रोत्यां भयनाशक सर्वत्र । पुत्रपौत्रादिकप्रद सर्वदा ।।४४।। धनधान्यादिक लाभून । अंती माझा लोक पावन । प्राप्त होऊन आनंद मग्न । मुक्त होतील ते सारे ।।४५।। ऐसें त्याचें ऐकून वचन । देव मुनिसत्तम भयहीन । हर्षभरें करिती नमन । प्रार्थिती तेव्हां चतुर्भुजासी ।।४६।। जरी प्रसन्नभावें वर देसी । तरी दृढ भक्ति दे आम्हांसी । तुझ्या पादपद्मी आम्हांसी । निरंतर पद देई देवा ।।४७।। आज्ञा करी महाभागा सांप्रत । दितिज दैत्यांनी संत्रस्त । आम्ही जाहलों समस्त । वाचवी आम्हां तूचि आतां ।।४८।। तेव्हां चतुर्भुज सांगत । आजपासून दैत्यांप्रत । पाताळ लोकीं राज्य आनंदांत । करुं द्यावें देवांनों ।।४९।। त्या महासुरांची हिंसा न करा । हें वचन ध्यानीं धरा । मीच स्थापिलें त्यांस न मारा । स्वस्थान पाताळ

तयांचें ।।५०।। स्वर्गांत देवांचें स्थान । पृथ्वीवरी राहती मानव प्रसन्न । पाताळांत दानव असुरजन । स्वधर्मपालन रत सारे ।।५१।। जरी कोणी मार्गभ्रष्ट । गर्वें देईल अन्यास कष्ट । तरी त्यांस लाभेल इष्ट । सिद्धि न लाभेल कदापि ।।५२।। आम्हीं तैसेंच करूं आचरण । ऐसें चतुर्भुजासी वचन देऊन । देव गेले स्वस्थानीं विनतमन । युद्ध संपविलें तयांनीं ।।५३।। पाताळांतून देवसेना परत । आली शांत होऊन स्वर्गांत । दैत्येंद्र झाले प्रमुदित । देव त्यांसी न मारिती तेथ ।।५४।। चतुर्भुज सर्व दैत्येंद्रापत । आज्ञा देई बळवंत । तेही त्याचें वचन ऐकत । मर्यादा पालनीं वचन देती ।।५५।। हर्षभरित स्वस्थळीं जात । चतुर्भुज तैं अंतर्धान पावत । कश्यप दिति समवेत । शोक करी विरहातुर ।।५६।। तेव्हां आकाशवाणी होत । चतुर्भुज मातापितरा सांगत । स्थापन करा माझी मूर्ति पुनीत । भजा तीस नित्य आदरें ।।५७।। त्या आज्ञेनुसार स्थापित । कश्यप दिति ब्राह्मणहस्तें त्वरित । चतुर्भुजाची मूर्ति भक्तियुक्त । सर्व सुखद पूजकांस ।।५८।। हृदयांत चिंतामणीस ध्याती । बाहेर चतुर्भुज मूर्ति पूजिती । ऐसें भक्तियुक्त घालविती । जीवन दिती कश्यप सदा ।।५९।। आसूर भाव सोडून । भक्तिपूर्ण चित्तीं होऊन । गाणपत्य स्वभावें पूजन । दिति करी चतुर्भुजाचें ।।६०।। ऐसें हें चतुर्भुजाचें चरित । सांगितलें तुज पुनीत । विघ्नराजाचा कलारूप ज्ञात । अवतार हा गाणेशपंथी ।।६१।। जो हें चरित वाचील । अथवा भक्तिभावें ऐकेल । त्यास भुक्ति मुक्ति लाभेल । तैसीच दृढ भक्ति विघ्नेश्वराची ।।६२।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते चतुर्भुजावतारविक्रमवर्णनं नाम पंचदशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पंधरांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । मुद्गल कथा पुढची सांगती । दक्षहृदयीं आनंद अती । ऐशापरी जगाची स्थिति । मर्यादायुक्त तैं होती ।।१।। परी तदनंतर दैत्येंद्र बळयुक्त । देवांसी जिंकण्या वांछित । प्रल्हादास नेता नेमित । युद्धास सज्ज जाहले ।।२।। ते ब्रह्मशापानें मोहित । दितीस विनम्रपणें वंदित । कश्यपासही वंदित । त्यांस देवी दिती म्हणे ।।३।। महादुष्टांनो स्वधर्म सोडून । नका करूं दैत्यांनो वर्तन । चतुर्भुजाची आज्ञा मानून । देवांनी युद्ध थांबविले ।।४।। त्यांचें स्थान स्वर्गभूमींत । पाताळांत तुम्हीं राज्य करा समस्त । चतुर्भुज ऐसी व्यवस्था करित । विसरलात का वचन त्याचें ।।५।। परी तिज प्रणाम करून । तिचा उपदेश अव्हेरून । दैत्येश लोभयुक्त मन । देव जयार्थ निघाले ।।६।। ते अधर्मानें प्रेरित । जेव्हां युद्ध करण्या जात । तेव्हां दैत्य पक्ष सोडून जात । कश्यपासह देवी दिती ।।७।। गणेशास ती भक्तियुक्त । भजूं लागली एकचित्त । तिकडे अदितीही मुनींसहित । देवपक्ष सोडितसे ।।८।। आपुल्या पुत्रासी भजत । विनायकासी प्रीतियुक्त । दैवी प्रकृति त्यागित । मूर्ति करी मातीची ।।९।। मृन्मूर्तिस्थ विनायका भजत । योगभावें प्रेमयुक्त । विनतादि कश्यपवचन मानित । त्याही भजती गणेशासी ।।१०।। तेव्हां दक्ष मुद्गलास विचारित । दैवी आपुली प्रकृती सोडून भजत । मानव गणेश्वरा भावयुक्त । कसे भजती तें सांगा ।।११।। मुद्गल तेव्हां त्यास सांगती । नर जें सकाम कर्म करिती । तें जरी यथाविधि आचरिती । परी तें आसुर जाणावें ।।१२।। देहसौख्य ते वांछित । म्हणोनि आसुर ख्यात । निष्काम जरी कर्म करित । तरी तैं दैव जाणावें ।।१३।। विधियुक्त दैवकर्म करित । तें मुक्तिप्रद असे ख्यात । स्वस्वधर्मस्थ जन करित । विविध कर्म तें योगरूप ।।१४।। देहधर्म समजून । कर्में करिती जे जन । देवप्रीत्यर्थ करितां कर्म पावन ।

भक्तिमय तें होतसे ।।१५।। तैसेंच भक्तिभावार्थ कर्म करित । स्त्रीसहित मुनि प्रमुदित । हें तुज कथिलें समस्त । चरित्र विघ्नराजाचें ।।१६।। सर्वसिद्धिप्रद शांतिद । पूर्णरूप भक्तिकारण सौख्यद । ऐसे नाना अवतार विशद । अशक्य त्यांचें वर्णन ।।१७।। हा विघ्नेश्वर देव समस्वानंदांत । सत्यासत्य निर्मून खेळत । आपुल्या मायाप्रभावें सतत । पूर्ण योगमय विघ्नराज हा ।।१८।। त्याचा अर्थ ऐक भावयुक्त । जेणें ब्रह्मबुद्धि प्रकाशत । संप्रज्ञानमय असत । ब्रह्म तसेंचि असंप्रज्ञात ।।१९।। भ्रमयुक्त महाविघ्नयुक्त । भ्रमहीन तेच विघ्नहीन ज्ञात । ब्रह्मांत होतां ब्रह्मभूत । उभयही तीं न राहती ।।२०।। सर्वांचा हा विघ्नराज असत । विघ्नकर्ता प्रजापते जगांत । तैसाचि विघ्नहर्ता साक्षात । ब्रह्मांचा हा निरंतर ।।२१।। स्वयं विघ्नयुत वा विघ्नहीन । नसे हा देव गजानन । ऐसें जाणून नर पावन । ब्रह्मभूत होतसे ।।२२।। हें विघ्नेश्वराचें चरित । जो नर ऐकत अथवा वाचित । त्यावरी विघ्नेश प्रसन्न होत । सर्वदा जाण सर्वत्र ।।२३।। विघ्नराजेंद्र होता प्रसन्न । दुर्लभ काय त्या नरास महान । सर्वसिद्धियुक्त होऊनी जन । ब्रह्मचि अन्तीं होईल ।।२४।। ह्यासम पावन कांही नसत । भुक्तिमुक्तिप्रद दक्षा हें चरित । पंचाग्नि साधनादि तपांनी लाभत । त्याहून अधिक हें पुण्यप्रद ।।२५।। ह्या चरित्राचें करितां श्रवण । तें सारें पुण्य लाभे तत्क्षण । विविध तीर्थयात्रा करून । जें पुण्य लाभतें जनांस ।।२६।। त्याहून अधिक पुण्य लाभत । नरास ह्या खंडाच्या श्रवणें त्वरित । सर्व यज्ञांचें जें फल असत । त्याहून अधिक पुण्य यांत ।।२७।। इष्टपूर्तादिक जें कर्म करून । लाभे नर पुण्य पावन । त्याहून अधिक पुण्य लाभ महान । हें थोर चरित्र वाचतां ।।२८।। पुत्रपौत्रादि संयुक्त । धनधान्यादींनी युक्त । आरोग्यसंपन्न पुण्यवंत । याच्या श्रवणें नर होई ।।२९।। वंध्यत्वादि दोषयुक्त ।

जरी असेल मानव पीडित । तरी या खंडाच्या श्रवणें होत । वीर्यवंत अपत्य युक्त ।।३०।। ज्याच्या घरांत हा खंड असेल । त्यास पिशाच्च चोरबाधा न बाधेल । विघ्नेश भक्तिप्रद हा विमल । चरित्र ग्रंथ जाणावा ।।३१।। अग्निसंभव वा राजसंभव । ग्रहसंभव तैसें राशिसंभव । पूतनादिक वा संभव । भय न बाधे पाठका श्रोत्या ।।३२।। हा खंड धर्मार्थभाव बोधप्रद । श्रवणें आधार ब्रह्मभूयद । काय वर्णावें बहुत मोदद । विघ्नेश्वर जेथ तेथ सौख्य ।।३३।। ऐसें हें विघ्नराज़ाचें चरित । सांगितलें तुज अद्भुत । त्या गणेशा भज एकचित्त । तेणें सुख तुज लाभेल ।।३४।। हें चरित्र सुखकर । दुर्जनासी वाचून न दाखवा गंभीर । जो जन साधुवृत्ति गणेशभक्तिपर । त्यासीच वाचून दाखवावें ।।३५।। सूत म्हणे शौनकाप्रत । इतुकें बोलून मुद्गल थांबत । हृष्टचित्त दक्ष वंदित । कर जोडोनी तयासी ।।३६।। जैसे मुद्गल मुखांतून स्रवलें । विघ्नपाचें चरित्र हें भले । तैसें समग्र तुज सांगितलें । संपूर्ण मी शौनक मुने ।।३७।। तुमच्या संगतीनें मी पुनीत । जाहलों निश्चित । शौनका आणखी काय वांछा असत । श्रवण करण्या तें सांग ।।३८।। विघ्नराजासम नसत । विप्रा अन्य कांहीं बळवंत । चरित्र विघ्नराजाचें सतत । सर्व सिद्धिप्रदायक हें ।।३९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे सप्तमे खंडे विघ्नराजचरिते चरितमाहात्म्यवर्णनं नाम षोडशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सोळांवा संपूर्ण)

।। इति श्रीमुद्गलपुराणे सप्तमः खंडः समाप्तः ।।

卐